एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार १६ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 103 Marathi - Daily - Mumbai, 16 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

अमेरिका आणि इराणमध्ये मोठा करार!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


## थोडक्यात...

### जयपूर आंदोलनात गोंधळ अभिजीत दीपकेवर हल्ला

**जयपूर** - जयपूरमध्ये आज कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपकेवर काही तरुणांनी हल्ला करत दीपकेच्या कानशिलात लगावली. यामुळे शांततापूर्ण आंदोलनादरम्यान मोठा गोंधळ झाला. दीपकेच्या समर्थकांनी या हल्लेखोरांना तिथून हाकलले. पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. शहीद स्मारक परिसरात आयोजित या आंदोलनात नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था आणि बेरोजगारी यांसारख्या मुद्यांवर आवाज उठवण्यासाठी मोठ्या संख्येने तरुण जमले होते. यावेळी आंदोलनात सहभागी झालेल्या काही तरुणांनी दीपकेच्या जवळ जाऊन त्याला मारहाण केली. हे पूर्वनियोजित होते. कॉकरोच पार्टीच्या समर्थकांनीही त्या तरुणांना पकडून मारहाण केली. यामुळे परिस्थिती तणावपूर्ण झाली. मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. याशिवाय या गर्दीत काही आंदोलकांचे मोबाईल चोरीला गेल्याची माहिती आहेत.

### मुंबईत २२ जूनपासून पावसाळी अधिवेशन

**मुंबई** - महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी आज मुंबईत कामकाज सल्लागार समितीची महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत होणार असल्याचे निश्चित झाले आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी व विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला. या ३ आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# अमेरिका-इराणमध्ये अखेर शांतता करार! शुक्रवारी सह्या होर्मुज खुले होणार! इस्त्रायलचे मात्र हल्ले सुरूच

**गेले सुमारे तीन महिने अख्ख्या जगाला वेठीस धरणारे अमेरिका-इराण युद्ध आज अखेर थांबले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प काल रात्री उशिरा ट्रुथ सोशलवर पोस्ट करून युद्धबंदी करार झाला असल्याची घोषणा केली. यामुळे जगभरातील शेअर बाजाराने उसळी घेतली. या करारानंतर होर्मुज सामुद्रधुनी खुली होणार असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. मात्र टोल, लेबनॉनवरील हल्ले, इराणची अणुक्षमता याबाबत अजूनही निर्णय झालेला नाही. शिवाय इस्त्रायलचे मंत्री बेन जीविर यांनी हा करार आम्ही मानत नाही असे म्हटले. ट्रम्प यांच्या युद्धबंदी कराराला न जुमानता इस्त्रायलने आज पुन्हा दक्षिण लेबनॉनमध्ये हल्ले केले. दक्षिण लेबनॉनमधील खियाम शहरावर दोन क्षेपणास्त्र हल्ले केले. तर कफार टेबनीट शहरात एका कारवर ड्रोनच्या सहाय्याने हल्ला केला. यामध्ये ७ जण जखमी झाले. इस्त्रायलच्या या युद्धखोरीमुळे हा करार कधीही मोडण्याचा धोका कायम आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या घडामोडीचे सकारात्मक पडसाद भारतीय शेअर बाजारातही उमटले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १,१२६.३६ अंकांच्या उसळीसह ७६,६५४.३१ अंकांवर उघडला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ३३९.२५ अंकांच्या वाढीसह २३,९६२.१५ अंकांवर पोहोचला होता.**



■ वॉशिंग्टन

**अमेरिकन** नौदलाला व इतर देशांच्या जहाजांना होर्मुज सामुद्रधुनीतून प्रवास करण्यास मंजुरी दिली आहे. येत्या शुक्रवारी १९ जून रोजी स्वित्झर्लंडमध्ये अमेरिका आणि इराणदरम्यान या शांतता करारावर सह्या होणार आहेत. त्याच दिवसापासून होर्मुज जगासाठी खुली होईल,असा दावाही ट्रम्प यांनी केला. ट्रम्प यांची ही घोषणा जगासाठी आनंदवार्ता ठरली आहे. मात्र, या युद्धबंदीबाबत »पान ७ वर

## उबाठा पक्ष पुन्हा फुटणार? संजय राऊत दिल्लीला रवाना

**यवतमाळ-वाशिमचे उबाठाचे खासदार संजय देशमुख हे मुलीच्या लग्नाच्या तयारीचे कारण सांगत काल मातोश्रीवरील महत्त्वाच्या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित राहिले नाहीत. मात्र आज दुसऱ्याच दिवशी ते दिल्लीला गेले. तिथे त्यांनी शिंदे गटाचे खासदार तथा केंद्रीयमंत्री प्रताप जाधव यांची भेट घेतली. त्यामुळे उबाठाचे खासदार फुटणार, या चर्चेला जोर आला. खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करण्याबाबतचे पत्र लोकसभा अध्यक्षांना दिल्याचे सांगितले जाऊ लागले. त्यानंतर आणखी घडामोडी घडल्या. उबाठाचे संजय राऊत तातडीने दिल्लीला रवाना झाले.**

■ मुंबई

**उबाठा** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल मातोश्रीवर पक्षाच्या १० खासदारांची महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीला संजय देशमुख यांनी ऑनलाईन



हजेरी लावली होती. त्यानंतर आज त्यांनी दिल्लीत शिंदे गटाचे मंत्री प्रताप जाधव यांची निवासस्थानी भेट घेतली. या भेटीमुळे 'ऑपरेशन टायगर' घडणार, असा संशय वाढला आहे. दरम्यान, वाढत्या चर्चांनंतर देशमुख यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क साधत स्पष्टीकरण दिले असे सांगितले जाते. यवतमाळ जिल्ह्यातील त्यांच्या शैक्षणिक संस्थेशी संबंधित प्रशासकीय कामासाठी ही भेट घेतल्याचा दावा त्यांनी केला.

संजय देशमुख यांच्या भेटीबाबत प्रताप जाधव म्हणाले की, संजय देशमुख आणि आम्ही संघटनेपासूनच मित्र आहोत. ते यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख होते त्या काळात मी बुलडाणा जिल्ह्याचा जिल्हाप्रमुख होतो. आम्ही दोघेही एकाच विभागातील असल्याने आमची मैत्री »पान ७ वर

## धनगर समाजाचे स्वप्न भंगले 'एसटी'त समावेश! मागणी फेटाळली

■ पणजी

**गोव्यातील** धनगर समाजाने कित्येक वर्षांपासून उराशी बाळगलेले अनुसूचित जमातींमध्ये (एसटी) समावेश होण्याचे स्वप्न अखेर भंग पावले आहे. केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाने धनगर समाजाचा एसटीमध्ये समावेश करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. या निर्णयाचा फटका महाराष्ट्रातील धनगर समाजालाही बसण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील धनगर समाजही अनेक वर्षांपासून एसटीमध्ये समावेश करण्याची मागणी करत आहे.

या निर्णयामुळे धनगर समाजातील नेते प्रचंड



संतापले आहेत. आपल्याला सुमारे दोन महिने अंधारात ठेवून हा निर्णय घेण्यात आला, असा आरोप त्यांनी केला आहे. आदिवासी विकास मंत्रालयाने हा निर्णय १ एप्रिल रोजी घेतला. त्याची माहिती गोवा सरकारला ८ एप्रिल रोजी देण्यात आली. मात्र गोवा सरकारने ही माहिती धनगर समाजाच्या नेत्यांपासून दोन महिने लपवून ठेवली, असा आरोप आहे. त्यामुळे नेते नाराज झाले आहेत.

केंद्र सरकारच्या निर्णयावर चर्चा करण्यासाठी आणि पुढील दिशा ठरवण्यासाठी ऑल गोवा धनगर समाज या संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत कवळेकर यांनी बोर्डा येथील मल्टीपर्पज हॉलमध्ये »पान ७ वर

## जी-७ शिखर परिषद सुरू मोदी उपस्थित! युक्रेनवर चर्चा

■ पॅरिस


**जी-७ राष्ट्रांची** दोन दिवसीय शिखर परिषद फ्रान्सच्या एव्हियन शहरात आज १५ जूनपासून सुरू झाली आहे. १८ जूनपर्यंत फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या देशांच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी सलग सातव्यांदा या शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. १६ आणि १७ जून असे दोन दिवस ही परिषद असणार आहे. फ्रान्सच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिखर परिषदेसाठी भारताला भागीदार देश (पार्टनर कंट्री) असा दर्जा देण्यात आला आहे. पंतप्रधान मोदी या परिषदेत विकसनशील, अर्धविकसित आणि अविकसित राष्ट्रांशी (ग्लोबल साऊथ) संबंधित मुद्दे मांडणार आहेत. उद्या युक्रेन आणि पूर्व आशियातील तणावाच्या स्थितीवर चर्चा होणार आहे.

आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतली विकसनशील, अर्ध विकसित आणि अविकसित देशांना ग्लोबल साऊथ म्हटले जाते. हे देश प्रामुख्याने दक्षिण गोलार्धातील देश आहेत. मात्र, यामध्ये भारत आणि चीनसारख्या उत्तर »पान ७ वर

## उपग्रह चित्रांत मान्सूनबाबत धक्कादायक वास्तव ढगांचे आवरण गायब! पावसाची प्रतीक्षा वाढणार

■ नवी दिल्ली

**असह्य** उकाड्याने देशातील नागरिक त्रस्त झाले असून पावसाचे कधी आगमन होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच आणखी काही दिवस पावसाळ्याची वाट बघावी लागणार असून उपग्रहातून घेतलेल्या चित्राने चिंता वाढली आहे. 'इन्सॅट-३डीएस' उपग्रहाने टिपलेल्या ताज्या चित्रांमध्ये सक्रिय मान्सूनदरम्यान दिसणारे दाट ढगांचे विस्तृत आवरण आढळून आलेले नाही. द्वीपकल्पीय आणि मध्य भारतातील बहुतांश भाग असामान्यरित्या स्वच्छ दिसत असून प्रमुख ढगांची हालचाल सध्या हिमालय परिसर, ईशान्य भारत आणि



गंगा खोऱ्याच्या उत्तरेकडील भागांपुरती मर्यादित आहे.

उपग्रह चित्रे आणि हवामान विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे की, अरबी समुद्रातून येणारा पाऊस कमकुवत आणि विखुरलेला दिसत आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, ४ जून ते १५ जून या कालावधीत देशात सरासरी ५३.७ मिमी पाऊस अपेक्षित होता. मात्र, प्रत्यक्षात केवळ १९.२ मिमी पावसाची नोंद झाली. देशव्यापी पर्जन्यमानात तब्बल ६४ टक्के तूट निर्माण झाली आहे. देशातील नैऋत्य मान्सूनची तीव्रता लक्षणीय कमी झाली आहे. दक्षिण आणि मध्य भारतात पावसाने पुढे वाटचाल केली असली तरी अनेक »पान ७ वर

## आता लालबाग-बोरिवलीतही पांढरा पट्टा! फुटपाथ व्यापला

■ मुंबई

**मुंबईतील** रस्ते, फुटपाथ आणि सोसायट्यांच्या परिसरात जैन धर्मीयांकडून मारण्यात येणाऱ्या पांढऱ्या पट्ट्यांचा वाद दिवसेंदिवस अधिकच चिघळत आहे. घाटकोपरमध्ये सुरू झालेला हा वाद दादर, गिरगाव आणि आता मराठीबहुल लालबागपर्यंत पोहोचला आहे. आज बोरिवलीत तर पूर्ण फुटपाथच पांढरा रंगवून टाकला आहे.

या मुद्यावरून सामाजिक आणि राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. सार्वजनिक जागांवर वारंवार पांढरे पट्टे मारले जात आहेत. त्यानंतर महापालिका कर्मचारी त्या पट्ट्यावर काळा रंग लावतात. पांढरा पट्टा काढणाऱ्यावर काहीच कारवाई होत नाही. आता तर मराठी माणसाला खिजवण्यासाठी मुद्दाम हे पट्टे काढत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे हे चक्र नेमके किती काळ सुरू राहणार आणि याबाबत प्रशासनाची भूमिका काय आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

लालबागच्या मसाला गल्ली परिसरातील पूनम पार्क सोसायटीच्या »पान ७ वर

## उन्हाळी सुट्टी संपली! चिमुकल्यांचे स्वागत मंत्री आणि नेते जिल्हा परिषद शाळेत हजर

■ मुंबई

**उन्हाळी** सुट्टीनंतर आज राज्यभरातील शाळांची घंटा पुन्हा एकदा वाजली. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळा परिसर चिमुकल्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेला. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे फुले, गुलाबपुष्प, औक्षण, मिठाई आणि शालेय साहित्य देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक मंत्री, आमदार, नेते आणि लोकप्रतिनिधींनी विविध जिल्हा परिषद शाळांना भेट देत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



वाढत्या उष्णतेमुळे विदर्भातील शाळा मात्र ३० जूनपासून सुरू होणार आहेत.

पनवेलमधील वहाळ येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी शाळेतील डिजिटल लॅब, आधुनिक सुविधा आणि शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाचा दर्जा खासगी शाळांपेक्षाही अधिक चांगला झाल्याचा दावा केला. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे, तर संवैधानिक मूल्ये, पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक जबाबदारीचे शिक्षण देण्यावर »पान ७ वर

## धरणांतील पाणी फक्त पिण्यासाठीच शेतीचे आवर्तन बंद करण्याचे आदेश

■ पुणे

**यावर्षी** मान्सूनवर 'एल-निनो'चा प्रभाव राहण्याची शक्यता आणि राज्यातील धरणांमधील घटता जलसाठा लक्षात घेऊन राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला. येत्या ३१ ऑगस्टपर्यंत धरणांमधील उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्याच्या गरजांसाठी राखीव ठेवणार असून शेतीसाठी सोडण्यात येणारी आवर्तने तातडीने बंद करण्याचे आदेश जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील अनेक भागांतील शेतकऱ्यांपुढे सिंचनाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्यात एकूण २४.७५ टक्के पाणीसाठा असून पुण्यात सर्वात कमी १४.५७ टक्के पाणीसाठा आहे. अमरावतीत ३८ टक्के, नागपूर ३६ टक्के , कोकणात ३०.७० टक्के,मराठवाड्यात २८ टक्के व नाशिकसाठी २६ टक्केच पाणी उपलब्ध आहे. या परिस्थितीमुळे उद्यापासून पुण्यात १ दिवसाआड पाणी सोडले जाणार आहे. नाशिक जिल्ह्यात येवला, नांदगावसह ११ तालुक्यात भीषण पाणीटंचाई भासत आहे. कोकणपट्टीत शेतकऱ्यांनी धूळ पेरणी केली, पण पाऊस नसल्याने त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट येणार आहे.

काल पुण्यातील सिंचन भवन येथे कृष्णा आणि गोदावरी खोऱ्यातील धरणांच्या पाणीसाठ्याचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण »पान ७ वर

## ऑस्ट्रेलिया,कॅनडानंतर ब्रिटनमध्येही अल्पवयीन मुलांना सोशल मीडिया बंदी

**ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील आणि इंडोनेशिया या देशांनंतर आता ब्रिटनमध्ये सोळा वर्षांखालील अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात येणार आहे. पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आज याबाबत घोषणा केली. पुढील वर्षापासून ही बंदी प्रत्यक्षात लागू होणार आहे. मात्र या बंदीमध्ये कोणकोणते सोशल मीडिया प्लॅटफॉर्म सामील केले जातील, हे स्टार्मर यांनी स्पष्ट केले नाही.**



■ लंडन

**आपण** आपल्या मुलांना इंटरनेटपासून कसे सुरक्षित राखायचे हा सध्याच्या घडीचा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे. त्यावर सरकारने एक तोडगा काढला आहे. हा तोडगा जगासाठी दिशादर्शक ठरेल. ऑस्ट्रेलियामध्ये लागू असलेल्या सोशल मीडिया बंदीहून तो कठोर असेल, असे स्टार्मर यांनी सांगितले. दरम्यान, अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील आणि इंडोनेशिया या देशांनी बंदी घातल्यानंतर त्याचे चांगले परिणाम त्या देशांमध्ये दिसून आले आहेत. त्यामुळे फ्रान्स, स्पेन, डेन्मार्क, थायलंड आणि दक्षिण कोरिया हे देशही अशाच प्रकारचे कायदे करण्याचा विचार करत आहेत.


सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## जरांगेंचा इशारा: सरकारने शब्द पाळला नाही तर २०२९ ला धडा शिकवू

■ कोल्हापूर

**मराठा** आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी राज्य सरकारला पुन्हा एकदा मराठा समाजाच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी केली. सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत आणि मराठा समाजाशी दगाफटका केला तर २०२९ च्या निवडणुकीत धडा शिकवू. असा थेट इशारा त्यांनी कोल्हापूर दौऱ्यात दिला. मराठा आरक्षण, विविध गॅझेटची अंमलबजावणी, शेतकरी प्रश्न आणि शक्तीपीठ महामार्ग या मुद्यांवर त्यांनी सविस्तर भूमिका मांडली. या दौऱ्यात त्यांनी अंबाबाई मंदिरात दर्शन घेऊन खासदार शाहू छत्रपती यांचीही भेट घेतली.

मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, सरकारने आम्हाला यापूर्वी अनेकदा फसवले आहे. मात्र अलीकडच्या काळात शासन निर्णय काढणे, ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रांचे वाटप, शिंदे समितीला मुदतवाढ, आंदोलनातील मृतांच्या कुटुंबियांना मदत आणि आंदोलनातील गुन्हे मागे घेण्यासारखे निर्णय घेतल्यामुळे काही प्रमाणात विश्वास निर्माण झाला आहे. विश्वास ठेवणे ही आमची जबाबदारी आहे. मात्र त्याचा अर्थ आम्ही शांत बसू असा नाही. सरकारने दगाफटका केल्यास आंदोलन तर होईलच, पण २०२९ च्या निवडणुकीची तयारीही करू. आम्ही शंभर टक्के सरकार पाडू.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/महिला पाहिजेत. **9987577655** {NC260871}

सिक्युरिटी गार्ड हाऊसकिपिंग पाहिजे. घाटकोपर, विलेपार्ले, दहिसर, गोरेगाव. **8097507698** {NC260919}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशिअन पाहिजेत. चांगला पगार + आकर्षक सुविधा. संपर्क : **9820683431** {NC260932}

१) अकाऊंट असिस्टंट पाहिजे. टॅली, वर्ड, एक्सेलचा अनुभव, वेस्टर्न भागात राहणाऱ्यांना प्राधान्य. २) हाऊसकिपिंग सुपरवायझर पाहिजे (१२ तास ड्युटी) रु. ७००/- रोज. ३) ड्रायव्हर पाहिजे. (१२ तास ड्युटी) रु.८००/- रोज. भेटाः- रुम नं.३०, सर्वोदया ट्रस्ट बिल्डींग, गोखले रोड साऊथ, दादर (वेस्ट) {NC260930}

फळबागेत काम करण्यासाठी नेरळ जिल्हा कर्जत येथे जोडपे पाहिजे. राहणे वीज आणि पाण्याची छान व्यवस्था. पगार २०,०००/- महिना. भेटाः रूम नं. ३०, सर्वोदया ट्रस्ट बिल्डींग, गोखले रोड साऊथ, दादर (वेस्ट) {NC260929}

मुंबई आणि इगतपुरीकरिता इलेक्ट्रिशियन, हेल्पर पाहिजेत. राहण्याची खाण्याची सोय. मोबाईल- **9220848134/ 9820432190** {NC260864}

टुकलर ऑफसेट प्रिंटिंगसाठी फीडरमन पाहिजेत. जरीमरी, कुर्ला अंधेरीरोड. संपर्कः- **9821036458** {NC260924}

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला- सेल्स/ मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटट, बाऊन्सर, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफीसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर हाऊसकीपिंग मुले/मुली पाहिजेत- **9223380568/69** {NC260798}

## पाहिजेत

निवृत्त, VRS, सुशिक्षित गृहिणींसाठी उत्पन्नाची अतिरिक्त संधी + सवलती उपलब्ध.- **9653681991** {NC260921}

फेलिसिटा चॉकलेट्स मुलुंड, हेल्पर/पॅकींग/ ऑफीस स्टाफ महिला पाहिजे **8080998658** {NC260859}

**ठाण्यातील लेडीज शोरूमसाठी**
**सेल्स गर्ल्स पाहिजेत**
ठाणे येथील एस. ए. इनामदार, या नामवंत रेडीमेड ब्लाऊज-च्या शोरूमसाठी फ्रेशर्स / अनुभवी सेल्सगर्ल पाहिजेत. (१०वी/१२वी पास) अर्जासह प्रत्यक्ष भेटा. पत्ता : चिंतामणी ज्वेलर्स शेजारी, जांभळी नाका, ठाणे. (प).
**9930198166**

नाशिक अम्बाडमध्ये क्लेरीकल कामासाठी ग्रॅज्युएट किंवा 12th पास महिला पाहिजेत. संपर्कः **9819853443.** {NC260936}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटरः **9819426634/ 9969529162** {NC260938}

पुरुष/महिला बाऊंसर अंधेरी-वेस्ट करिता. संपर्क- CISB PVT. LTD., B-46, नथानी हाईट्स, मुंबईसेंट्रल ब्रीज, मुंबई किंवा 301, कुशवाहा चेंबर्स, मकवाना रोड, अंधेरी-ईस्ट, मुंबई- **9869343565.** {NC260939}

दादर (पश्चिम) येथे गाडीसाठी अनुभवी, वक्तशीर, निर्व्यसनी ड्रायव्हर्स पाहिजेत. जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. **9987712677.** {NC260940}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पँट्रीबॉय- दादर, वरळी, मुंबई सेंट्रल, ठाणे, **8291056761/ 8422880511/ 8422880515 / 9326200875** {NC260942}

## पाहिजेत

प्लंबर इलेक्ट्रिशीयन आणि सुपरवायझर पाहिजेत. **9892342475** {NC260940}

## Situation Vacant

**A Chemical Factory at Vasai East- Urgently requires 1) Male Graduate (in any discipline) to manage & coordinate day-to-day factory activities 2) Helpers (12th studied). Salary negotiable for both post. Candidates can contact on mobile- 9321630032/ 9321630011.** {NC260838}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260937}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्वजाती, मुलींना फ्रि, कल्याण- **9869868620** {NC60820}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# आसामात १८ वर्षांवरील व्यक्तींना आता आधार कार्ड मिळणार नाही

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ गुवाहाटी

राज्यातील बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यासाठी व राष्ट्रीय सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आसाम सरकारने १८ वर्षांवरील नागरिकांना नवीन आधार कार्ड देण्यावर बंदी घातली आहे.आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा यांनी काल याबाबतचा

**राज्य सरकारचा निर्णय**

शासकीय निर्णय जाहीर केला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री हिमंत बिस्वा यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, आसाममध्ये आधार कार्डचे वितरण १०० टक्क्यांच्या पुढे गेल्याने, संशयित घुसखोरांना भारतीय ओळख मिळण्यापासून रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या नियमाचा फटका १८ वर्षांखालील मुलांना बसणार नाही आणि त्यांची आधार नोंदणी पूर्वीसारखीच सुरू राहील. चहा बागांमधील कामगार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना या नियमातून ३१ मार्च २०२७ पर्यंत सूट देण्यात आली आहे.

# काश्मीरच्या दाल सरोवरावरील तरंगत्या मॅगी स्टॉलमुळे संताप

श्रीनगर - काश्मीरच्या दाल सरोवरावरील तरंगत्या मॅगी स्टॉलमुळे सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून लोकांनी या स्टॉलला किळसवाणे मार्केटिंग म्हटले. एका वापरकर्त्याने म्हटले की, निसर्गाची काही ठिकाणे जशी आहेत तशीच राहू द्या. सर्व निसर्गरम्य ठिकाणे ही जाहिरातींचे फलक नाहीत. दुसऱ्या एकाने म्हटले की, तुम्ही डोंगर उद्ध्वस्त केले आहेत, आता तुम्ही आमचे जलस्रोत नष्ट करणार आहात. या शांत आणि सुंदर जागेचे व्यावसायिकीकरण होत असल्याने नेटकऱ्यांनी यावर तीव्र संताप व्यक्त केला.

# महिलेवर शार्कचा हल्ला! सिडनीचे बीच बंद

■ सिडनी

**सिडनीमधील** प्रसिद्ध कूगी बीचवर एका ३५ वर्षीय महिलेवर शार्कने हल्ला केला,ज्यामध्ये ती गंभीर जखमी झाली. घटनेनंतर उपस्थित नागरिकांनी तिला त्वरित पाण्यातून बाहेर काढून प्रथमोपचार दिले आणि हेलिकॉप्टरद्वारे तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या हल्ल्यानंतर सुरक्षा खबरदारी म्हणून कूगी बीचसह परिसरातील अनेक समुद्रकिनारे तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. शार्कच्या शोधासाठी हेलिकॉप्टर आणि जेट स्कीच्या मदतीने समुद्रात गस्त घातली जात आहे.

# स्वित्झर्लंडच्या लोकांनी १० दशलक्ष लोकसंख्या मर्यादेचा प्रस्ताव नाकारला

■ बर्न

**स्वित्झर्लंडमधील** मतदारांनी देशाची लोकसंख्या १० दशलक्षपर्यंत मर्यादित ठेवण्याचा प्रस्ताव सार्वमतात नाकारला. ५५ टक्के मतदारांनी या प्रस्तावाच्या विरोधात तर ४५ टक्के मतदारांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले.

हा प्रस्ताव स्वित्झर्लंडमधील उजव्या विचारसरणीच्या 'स्वीस पीपल्स पार्टी'ने मांडला होता. वाढत्या स्थलांतरामुळे देशाच्या पायाभूत सुविधा, गृहनिर्माण आणि पर्यावरणावर ताण पडत असल्याचा दावा पक्षाने केला होता.२०५० पूर्वी स्वित्झर्लंडची कायमस्वरूपी लोकसंख्या १० दशलक्ष पार जाऊ नये, अशी मर्यादा घालण्याची मागणी या प्रस्तावात करण्यात आली होती. सध्या स्वित्झर्लंडची लोकसंख्या ९.१ दशलक्ष आहे. नागरिकांनी या चिंतेपेक्षा देशाची आर्थिक स्थिरता आणि युरोपियन युनियनसोबतचे संबंध टिकवून ठेवण्याला प्राधान्य दिले. हा प्रस्ताव मंजूर झाला असता तर लोकसंख्या ९.५ दशलक्षवर पोहोचताच आश्रय आणि कौटुंबिक पुनर्मिलनावर मर्यादा आल्या असत्या.

# शरद पवार यांच्या कुस्ती संघटनेला उच्च न्यायालयाचा मोठा धक्का

■ मुंबई

**राष्ट्रवादी** (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेला उच्च न्यायालयाने सोमवारी धक्का दिला. भारतीय कुस्ती महासंघाने या परिषदेची संलग्नता रद्द करण्याचा घेतलेला निर्णय उच्च न्यायालयाने कायम ठेवला. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने या परिषदेची याचिका फेटाळली. महासंघाने १ जानेवारी २०२३ रोजी परिषदेची संलग्नता रद्द केली होती. महासंघाने मूळ संघटनेऐवजी 'महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ' या नव्या गटाला अधिकृत मान्यता दिली

**कुस्तीगीर परिषदेची संलग्नता रद्द करण्याचा निर्णय कायम**

होती. या निर्णयाला पवार यांच्या संघटनेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. कुस्ती महासंघाच्या कार्यकारी समितीऐवजी 'ओव्हरसाईट कमिटी'ने (निरीक्षक समिती) हा निर्णय घेतला असून तो पूर्णपणे मनमानी आणि बेकायदेशीर आहे, असा युक्तिवाद परिषदेने केला होता. शरद पवार हे गेल्या ४० हून अधिक वर्षांपासून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे नेतृत्व करत होते. मात्र, ४ जुलै २०२२ रोजी कुस्ती महासंघाने ही समिती बरखास्त केली होती.

# कळंबोली अग्निशमन विभागाच्या संपर्क क्रमांकांत तात्पुरता बदल

■ पनवेल

**बीएसएनएल** फायबर लाईनचे काम सुरू असल्यामुळे पनवेल महापालिकेच्या कळंबोली अग्निशमन विभागाच्या काही दूरध्वनी सेवांवर तात्पुरता परिणाम होणार आहे. विशेषतः कळंबोली अग्निशमन केंद्राचे दूरध्वनी क्रमांक पुढील ३ ते ४ दिवस तात्पुरते बंद राहण्याची शक्यता असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

कळंबोली अग्निशमन केंद्राचे ०२२-२७४२०१३७ व ०२२-२७४२०१३८ हे दूरध्वनी क्रमांक बीएसएनएल फायबर केबलच्या कामामुळे तात्पुरते बंद राहणार आहेत. त्यामुळे पनवेल, कामोठे, कळंबोली व परिसरातील नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कालावधीत आग, आपत्ती अथवा इतर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास नागरिकांनी कळंबोली अग्निशमन केंद्र ०२२-६९३६५८०२, मनीष ब्राह्मणकर (उप अग्निशमन अधिकारी) ८८८८५७७५४२, फत्तेसिंग गायकवाड (उप अग्निशमन अधिकारी) ७४१०१११६८, कामोठे अग्निशमन केंद्र ८४५४९२४८४५ / ८५५४८१८९४५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# मुरबाड बदलापूर मार्ग दीड महिन्यापासून बंद

■ मुरबाड

**मुरबाड-बदलापूर** बारवी डॅम रस्त्याच्या कॉंक्रीटीकरण व पुलाच्या कामामुळे गेली दीड महिना हा मार्ग वाहतुकीस बंद असून सध्या म्हसा बोराडपाडा या मार्गाने बससेवा सुरू आहे. म्हसा बोराडपाडा मार्गे बदलापूर येथे जाण्यासाठी तब्बल दोन तास लागत असून प्रवाशांना ८४ रुपये मोजावे लागत आहे. यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रवासी वर्गात संताप व्यक्त होत आहे. १ मे ते २२ मे पर्यंत मुरबाड बारवी डॅम मार्ग वाहतुकीस बंद केल्याचे संबंधित ठेकेदाराने मुरबाड आगाराला कळवले यानंतर पुन्हा मुदतवाढ घेऊन १५ जूनपर्यंत सदर मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे लेखी कळविले. मात्र अजूनही काम अपूर्ण असल्याने या मार्गावरील बस फेऱ्या बंद आहेत. मार्गावरून जाण्यासाठी प्रवाशांना कमी वेळ कमी पैसे मोजावे लागत असल्याने अनेक प्रवासी खाजगी प्रवासी वाहतुकीचा वापर करीत असल्याने याचा तोटा मुरबाड आगाराला सोसावा लागत आहे.

# नवी मुंबईत शिंदेंना पुन्हा डावलले गणेश नाईकांची गाडी अडवली

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महानगरपालिकेच्या कार्यक्रमपत्रिकेत उपमुख्यमंत्री व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव वगळल्याने पुन्हा एकदा राजकीय वाद पेटला आहे. या प्रकाराचा निषेध करत शिंदे गटाने आज आंदोलन केले. वाशी येथील रुग्णालयातील कार्यक्रमासाठी आलेले भाजपाचे वनमंत्री गणेश नाईक यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न शिवसैनिकांनी केला आणि जोरदार घोषणाबाजी केली. नवी मुंबईत भाजपाकडून एकनाथ शिंदे यांचे नाव वारंवार डावलले जात असल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना गणेश नाईक यांनी म्हटले की, मला या कार्यक्रम पत्रिकेबाबत कोणतीही कल्पना नाही. हा पालिकेचा अंतर्गत विषय असून याबाबत तुम्ही थेट महापालिका आयुक्तांनाच विचारा, त्यांनी या वादावर अधिक बोलणे टाळले. तर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले की जाणूनबुजूनच डावलले जात आहे. मंत्री संजय शिरसाट यांनीही या प्रकाराची गंभीर दखल घेण्याची मागणी केली असून, प्रोटोकॉल न पाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, याआधीही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निमंत्रण देण्यात आले नव्हते.

# शिर्डीत आणखी एका भोंदू अशोक खरातला अटक

■ नाशिक

**राज्यात** 'भोंदू' प्रकरणांची चर्चा सुरू असतानाच शिर्डी पोलिसांनी आणखी एका अशोक खरात नावाच्या भोंदूला अटक करून कारवाई केली आहे. आंतरजातीय विवाह निर्विघ्न पार पाडून देण्याचे आमिष दाखवत एका जोडप्याकडून तब्बल ५१ हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सांगलीतील एका तरुण-तरुणीचे प्रेमसंबंध होते. आंतरजातीय विवाहामुळे अडचणी येऊ शकतात, अशी भीती निर्माण करून कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथील अशोक खरातने स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा दावा केला. नातेवाईकांनी करणी केल्याचे सांगत त्याने जोडप्याला घाबरवले आणि विविध पूजा-विधींच्या नावाखाली वर्षभरात वेळोवेळी पैसे उकळले. दरम्यान, अमावास्येच्या दिवशी विशेष पूजेसाठी बोलावल्याची माहिती मिळताच शिर्डी पोलिसांनी सापळा रचत धाड टाकली आणि खरातला रंगेहात पकडले.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. १६ जून २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | कामानिमित्त दूरचा प्रवास घडेल. पैशांची कामे हळूहळू मार्गी लागतील. भावंडांशी मतभेद टाळा. |
| वृषभ | अनेक प्रश्नांवर मार्ग निघेल. कुटुंबीयाबरोबर छोट्या सहलीचा आनंद लुटाल. नोकरीसाठी अधिक प्रवास करावा लागेल. |
| मिथुन | आत्मविश्वासाने कार्यरत राहाल. मात्र अती धाडस त्रासदायक ठरू शकते. आवडत्या भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कर्क | नोकरीत घाईने कोणताही निर्णय घेऊ नका. व्यावसायिक गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगावी. प्रवासात सतर्कता बाळगावी. |
| सिंह | व्यवसायामध्ये अडलेली कामे मार्गी लागतील. सहकाऱ्यांना समजून घ्यावे लागेल. नोकरीत जबाबदारी स्वीकारावी लागेल. |
| कन्या | व्यवसायात अपेक्षित धनलाभ होईल. प्रिय व्यक्तींकडून भेटवस्तू मिळतील. सामाजिक क्षेत्रात अनेक कामे सुरू कराल. |
| तूळ | मित्रांबरोबर दूरच्या प्रवासाचा योग येईल. प्रेमविवाहासंदर्भात अनुकूलता. कलागुणांचे कौतुक होईल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात अचानक अडचणी येण्याची शक्यता. कामाला विलंब होईल. तब्येतीच्या समस्या उद्भवू शकतात. |
| धनु | मनात सकारात्मक विचार राहतील. व्यावसायिक स्थिती चांगली राहील. जोडीदाराबरोबर प्रवास कराल. |
| मकर | योजलेल्या कामांमध्ये अचानक बदलाची शक्यता राहील. कामाचा ताण वाढेल. नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग. |
| कुंभ | नोकरीत कामाचे कौतुक होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. कलागुणांना वाव मिळेल. |
| मीन | घरसजावटीवर खर्च कराल. कुटुंबातील सदस्यांमध्ये एकोपा राहील. नोकरीत यश मिळेल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 24 • सोडत दिनांक 15/06/2026

| बक्षीस | क्रमांक | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | SL-00 : 4590 | महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 4590 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 8828 | अंबिका एजन्सी - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1123 | 1881 | 2374 | 3952 | 4949 | 5246 | 7083 | 7268 | 7960 | 8470 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0851 | 1658 | 2000 | 3349 | 4496 | 5326 | 5451 | 5820 | 7239 | 8995 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2462 | 3478 | 3765 | 4254 | 4384 | 4963 | 5053 | 6342 | 7265 | 9724 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0608 | 1700 | 1706 | 1981 | 3545 | 4863 | 5810 | 6745 | 7608 | 8975 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1241 | 1879 | 2672 | 3379 | 4141 | 4796 | 5555 | 6379 | 7141 | 7857 | 8816 | 9550 |
| | | 1291 | 1911 | 2675 | 3430 | 4142 | 4845 | 5557 | 6394 | 7150 | 7867 | 8821 | 9579 |
| | | 1304 | 2029 | 2680 | 3436 | 4175 | 4909 | 5558 | 6398 | 7166 | 7877 | 8826 | 9589 |
| | | 1318 | 2034 | 2726 | 3440 | 4184 | 4924 | 5574 | 6543 | 7173 | 7887 | 8839 | 9620 |
| | | 1343 | 2062 | 2791 | 3450 | 4191 | 4929 | 5594 | 6561 | 7208 | 7897 | 8845 | 9626 |
| 0003 | 0585 | 1347 | 2064 | 2802 | 3490 | 4244 | 4998 | 5596 | 6565 | 7215 | 7926 | 8865 | 9632 |
| 0006 | 0623 | 1365 | 2072 | 2810 | 3494 | 4305 | 5025 | 5645 | 6566 | 7216 | 7953 | 8887 | 9638 |
| 0008 | 0630 | 1373 | 2102 | 2813 | 3504 | 4314 | 5026 | 5662 | 6591 | 7247 | 7977 | 8896 | 9640 |
| 0016 | 0650 | 1381 | 2122 | 2818 | 3540 | 4334 | 5039 | 5694 | 6609 | 7275 | 8010 | 8900 | 9684 |
| 0025 | 0702 | 1390 | 2124 | 2828 | 3579 | 4348 | 5055 | 5716 | 6621 | 7276 | 8028 | 8903 | 9693 |
| 0044 | 0710 | 1394 | 2125 | 2871 | 3632 | 4364 | 5057 | 5735 | 6629 | 7284 | 8047 | 8988 | 9696 |
| 0057 | 0713 | 1415 | 2129 | 2892 | 3655 | 4374 | 5058 | 5788 | 6639 | 7323 | 8051 | 8995 | 9707 |
| 0065 | 0806 | 1432 | 2193 | 2899 | 3656 | 4381 | 5067 | 5799 | 6647 | 7347 | 8056 | 9039 | 9708 |
| 0081 | 0810 | 1457 | 2194 | 2909 | 3693 | 4395 | 5135 | 5828 | 6662 | 7353 | 8057 | 9096 | 9739 |
| 0102 | 0885 | 1485 | 2202 | 2913 | 3703 | 4406 | 5151 | 5862 | 6671 | 7370 | 8082 | 9099 | 9751 |
| 0103 | 0895 | 1492 | 2207 | 2933 | 3734 | 4413 | 5167 | 5950 | 6682 | 7378 | 8085 | 9141 | 9767 |
| 0176 | 0896 | 1526 | 2212 | 2963 | 3738 | 4414 | 5193 | 5958 | 6693 | 7400 | 8088 | 9151 | 9779 |
| 0183 | 0898 | 1541 | 2215 | 2970 | 3763 | 4421 | 5216 | 5975 | 6694 | 7411 | 8144 | 9189 | 9794 |
| 0194 | 0901 | 1544 | 2220 | 3015 | 3768 | 4434 | 5225 | 5991 | 6711 | 7417 | 8150 | 9191 | 9818 |
| 0200 | 0907 | 1563 | 2222 | 3038 | 3798 | 4450 | 5232 | 6031 | 6724 | 7458 | 8214 | 9192 | 9824 |
| 0221 | 0912 | 1599 | 2227 | 3057 | 3812 | 4452 | 5270 | 6048 | 6760 | 7472 | 8256 | 9209 | 9829 |
| 0249 | 0990 | 1632 | 2238 | 3074 | 3830 | 4456 | 5274 | 6065 | 6762 | 7480 | 8301 | 9271 | 9849 |
| 0268 | 0993 | 1637 | 2319 | 3078 | 3832 | 4477 | 5313 | 6066 | 6780 | 7496 | 8325 | 9275 | 9890 |
| 0308 | 1012 | 1650 | 2382 | 3104 | 3835 | 4490 | 5314 | 6069 | 6781 | 7505 | 8381 | 9304 | 9891 |
| 0309 | 1021 | 1669 | 2395 | 3137 | 3839 | 4492 | 5325 | 6109 | 6836 | 7507 | 8396 | 9309 | 9896 |
| 0310 | 1034 | 1706 | 2402 | 3183 | 3842 | 4505 | 5327 | 6111 | 6873 | 7557 | 8400 | 9326 | 9906 |
| 0312 | 1048 | 1711 | 2424 | 3202 | 3850 | 4534 | 5358 | 6143 | 6874 | 7575 | 8406 | 9329 | 9909 |
| 0393 | 1089 | 1725 | 2434 | 3222 | 3852 | 4541 | 5378 | 6171 | 6879 | 7609 | 8409 | 9339 | 9926 |
| 0403 | 1118 | 1736 | 2444 | 3233 | 3890 | 4544 | 5383 | 6189 | 6881 | 7642 | 8459 | 9369 | 9933 |
| 0404 | 1147 | 1769 | 2445 | 3249 | 3927 | 4549 | 5453 | 6226 | 6895 | 7659 | 8478 | 9393 | 9941 |
| 0408 | 1152 | 1778 | 2463 | 3279 | 3928 | 4583 | 5465 | 6256 | 6906 | 7725 | 8491 | 9430 | 9948 |
| 0428 | 1173 | 1804 | 2465 | 3303 | 3953 | 4604 | 5471 | 6258 | 6921 | 7732 | 8542 | 9434 | 9953 |
| 0435 | 1187 | 1808 | 2492 | 3305 | 3964 | 4624 | 5478 | 6265 | 6949 | 7752 | 8572 | 9443 | 9955 |
| 0456 | 1190 | 1810 | 2523 | 3333 | 3966 | 4646 | 5486 | 6267 | 6981 | 7753 | 8581 | 9469 | 9973 |
| 0476 | 1196 | 1811 | 2540 | 3344 | 3978 | 4664 | 5507 | 6277 | 7031 | 7775 | 8650 | 9479 | 9974 |
| 0482 | 1197 | 1817 | 2621 | 3350 | 4014 | 4702 | 5512 | 6297 | 7057 | 7776 | 8657 | 9495 | 9979 |
| 0503 | 1212 | 1851 | 2638 | 3357 | 4042 | 4710 | 5515 | 6300 | 7084 | 7798 | 8663 | 9496 | 9980 |
| 0520 | 1220 | 1856 | 2648 | 3360 | 4065 | 4746 | 5521 | 6323 | 7104 | 7813 | 8687 | 9499 | 9988 |
| 0541 | 1233 | 1861 | 2650 | 3365 | 4070 | 4749 | 5532 | 6340 | 7113 | 7815 | 8755 | 9514 | 9994 |
| 0573 | 1234 | 1864 | 2667 | 3373 | 4084 | 4777 | 5540 | 6363 | 7127 | 7843 | 8801 | 9542 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 15/06/2026

| बक्षीस | क्रमांक |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-04 : 5017 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 8156 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6327 |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1417 | 2430 | 2883 | 2999 | 5230 | 6749 | 6921 | 8073 | 9846 | 9926 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1225 | 1287 | 2198 | 2406 | 4418 | 6196 | 7216 | 7938 | 8106 | 8612 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0287 | 2252 | 3291 | 3381 | 3992 | 5140 | 5716 | 6229 | 8812 | 9091 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1584 | 2442 | 3273 | 4507 | 5453 | 6423 | 7204 | 8228 | 9057 |
| | | 1592 | 2484 | 3318 | 4542 | 5493 | 6431 | 7254 | 8371 | 9160 |
| | | 1615 | 2555 | 3359 | 4557 | 5535 | 6506 | 7297 | 8373 | 9279 |
| 0007 | 0458 | 1632 | 2563 | 3366 | 4566 | 5545 | 6518 | 7335 | 8444 | 9378 |
| 0010 | 0500 | 1914 | 2608 | 3373 | 4583 | 5549 | 6522 | 7437 | 8475 | 9427 |
| 0017 | 0506 | 1919 | 2648 | 3374 | 4644 | 5575 | 6547 | 7578 | 8499 | 9450 |
| 0028 | 0569 | 1934 | 2663 | 3381 | 4649 | 5577 | 6583 | 7618 | 8578 | 9549 |
| 0093 | 0573 | 1971 | 2673 | 3402 | 4712 | 5587 | 6611 | 7622 | 8598 | 9552 |
| 0095 | 0790 | 1976 | 2738 | 3437 | 4746 | 5654 | 6658 | 7687 | 8599 | 9563 |
| 0100 | 0798 | 2000 | 2820 | 3442 | 4785 | 5657 | 6677 | 7706 | 8624 | 9588 |
| 0220 | 0880 | 2020 | 2903 | 3590 | 4824 | 5665 | 6684 | 7766 | 8681 | 9610 |
| 0226 | 1131 | 2032 | 2912 | 3637 | 4916 | 5755 | 6698 | 7783 | 8828 | 9691 |
| 0271 | 1140 | 2162 | 2918 | 3730 | 4961 | 5775 | 6850 | 7822 | 8842 | 9737 |
| 0291 | 1153 | 2196 | 2925 | 3763 | 5049 | 6150 | 6852 | 7922 | 8857 | 9759 |
| 0301 | 1187 | 2199 | 2986 | 3764 | 5159 | 6206 | 6969 | 7925 | 8879 | 9793 |
| 0390 | 1321 | 2205 | 3048 | 3951 | 5224 | 6296 | 7036 | 8005 | 8885 | 9824 |
| 0410 | 1382 | 2259 | 3124 | 4008 | 5323 | 6300 | 7038 | 8019 | 8976 | 9855 |
| 0434 | 1405 | 2277 | 3135 | 4054 | 5400 | 6316 | 7070 | 8043 | 8980 | 9915 |
| 0444 | 1509 | 2281 | 3230 | 4060 | 5424 | 6363 | 7091 | 8115 | 9017 | 9966 |
| 0450 | 1515 | 2296 | 3233 | 4261 | 5433 | 6387 | 7102 | 8145 | 9027 | 9976 |
| 0457 | 1537 | 2429 | 3248 | 4464 | 5450 | 6388 | 7127 | 8183 | 9029 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • धनलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 15/06/2026

| बक्षीस | क्रमांक |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SL-01 : 8312 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0502 | 0580 | 1606 बाळ लॉटरी सेंटर - सोलापूर | 1913 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 3763 | 4044 | 6688 | 8903 | 9198 | 9697 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0876 | 1849 | 1958 | 2468 | 4610 | 5653 | 6808 | 6873 | 7532 | 8006 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0616 | 1086 | 1461 | 1892 | 3458 | 5332 | 5725 | 7323 | 7904 | 9723 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 1141 | 2021 | 3217 | 4460 | 5562 | 6613 | 8067 | 8983 |
| | 1156 | 2063 | 3430 | 4467 | 5595 | 6624 | 8088 | 9167 |
| 0046 | 1163 | 2082 | 3502 | 4511 | 5598 | 6625 | 8185 | 9324 |
| 0073 | 1211 | 2157 | 3700 | 4525 | 5678 | 6629 | 8249 | 9393 |
| 0124 | 1378 | 2264 | 3763 | 4554 | 5752 | 7049 | 8398 | 9442 |
| 0520 | 1408 | 2274 | 4021 | 4564 | 5765 | 7097 | 8471 | 9525 |
| 0606 | 1441 | 2552 | 4043 | 4649 | 5785 | 7373 | 8583 | 9615 |
| 0808 | 1451 | 2612 | 4084 | 4802 | 5947 | 7711 | 8598 | 9718 |
| 0830 | 1723 | 2647 | 4103 | 4914 | 5953 | 7713 | 8628 | 9791 |
| 0909 | 1724 | 3037 | 4142 | 5027 | 5971 | 7753 | 8682 | 9883 |
| 0938 | 1764 | 3057 | 4143 | 5485 | 6146 | 7875 | 8862 | 9945 |
| 0981 | 1880 | 3061 | 4334 | 5503 | 6380 | 7937 | 8869 | 9966 |
| 1122 | 1889 | 3139 | 4429 | 5540 | 6467 | 7942 | 8957 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता. १६/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ७ | ३ | ८ |
| ७० | ३१ | ८१ |
| ७५ | ३६ | ८६ |
| १२४ | १२० | ४५९ |
| ४६७ | ४९० | ३७८ |

# कॉमेडियन प्रणित मोरेच्या घराबाहेर महिलांचे आंदोलन

■ नवी मुंबई

३७० चिकन बिर्याणी वादामुळे चर्चेत आलेले स्टँड-अप कॉमेडियन प्रणित मोरे यांच्या खारघर येथील निवासस्थानाबाहेर महिला संघटनांनी जोरदार आंदोलन केले. गुरुग्राम येथे झालेल्या त्यांच्या शोदरम्यान घडलेला प्रसंग सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हा वाद अधिक चिघळला आहे.

शोदरम्यान प्रेक्षकांशी संवाद साधताना २३ वर्षीय युवकाने '३७० खर्च केले असल्याने ते वसूल करणार' असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. हा मजकूर प्रणित मोरे यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केल्याने, संमतीशिवायच्या आशयाचे समर्थन केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महिला संघटनांनी मोरे यांच्या घराबाहेर निषेध नोंदवत आंदोलन केले. आंदोलकांनी प्रतिकात्मक निषेध म्हणून चिकन बिर्याणीचे पार्सलही त्यांच्या घरी देण्याचा प्रयत्न केला.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 24 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 15/06/2026

| बक्षीस | क्रमांक |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-01 : 9342 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0233 | 0864 | 1534 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 3882 | 4395 | 5102 | 7097 | 7564 | 9191 | 9505 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1233 | 4569 | 5205 | 5326 | 6635 | 6641 | 6766 | 6774 | 6966 | 7487 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0106 | 1218 | 1350 | 1967 | 2059 | 7329 | 8200 | 8779 | 9183 | 9212 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0603 | 0871 | 2341 | 4080 | 4183 | 5140 | 5909 | 6577 | 7062 | 9988 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 100/- | | 1607 | 2443 | 3154 | 3836 | 5041 | 5758 | 6810 | 7787 | 8686 | 9467 |
| | | 1649 | 2461 | 3183 | 3877 | 5050 | 5806 | 6816 | 7797 | 8687 | 9470 |
| 0064 | 0750 | 1669 | 2514 | 3218 | 3998 | 5072 | 5812 | 6848 | 7802 | 8707 | 9552 |
| 0067 | 0753 | 1677 | 2522 | 3224 | 4020 | 5074 | 5852 | 6910 | 7832 | 8739 | 9590 |
| 0068 | 0847 | 1777 | 2523 | 3232 | 4085 | 5125 | 5985 | 7079 | 7837 | 8786 | 9598 |
| 0116 | 0856 | 1890 | 2541 | 3303 | 4123 | 5180 | 6166 | 7140 | 7906 | 8810 | 9604 |
| 0117 | 0906 | 1901 | 2555 | 3315 | 4147 | 5266 | 6283 | 7171 | 7908 | 8826 | 9678 |
| 0181 | 1010 | 1903 | 2669 | 3316 | 4156 | 5303 | 6291 | 7215 | 7950 | 8827 | 9699 |
| 0191 | 1071 | 1932 | 2723 | 3334 | 4182 | 5459 | 6292 | 7274 | 8008 | 8830 | 9714 |
| 0303 | 1101 | 2002 | 2759 | 3349 | 4304 | 5522 | 6426 | 7302 | 8053 | 8832 | 9839 |
| 0352 | 1128 | 2021 | 2762 | 3391 | 4324 | 5525 | 6446 | 7339 | 8081 | 8834 | 9854 |
| 0388 | 1196 | 2056 | 2779 | 3428 | 4335 | 5552 | 6462 | 7364 | 8128 | 8844 | 9868 |
| 0405 | 1281 | 2071 | 2813 | 3443 | 4344 | 5557 | 6526 | 7379 | 8170 | 8882 | 9890 |
| 0473 | 1297 | 2128 | 2832 | 3493 | 4394 | 5578 | 6559 | 7397 | 8215 | 8908 | 9892 |
| 0500 | 1311 | 2152 | 2926 | 3501 | 4437 | 5588 | 6580 | 7467 | 8277 | 9026 | 9906 |
| 0509 | 1352 | 2234 | 2950 | 3574 | 4449 | 5594 | 6596 | 7507 | 8344 | 9085 | 9909 |
| 0510 | 1363 | 2245 | 3006 | 3628 | 4489 | 5610 | 6600 | 7562 | 8386 | 9187 | 9914 |
| 0528 | 1414 | 2282 | 3036 | 3709 | 4544 | 5646 | 6630 | 7636 | 8422 | 9246 | 9930 |
| 0560 | 1459 | 2295 | 3045 | 3726 | 4561 | 5652 | 6634 | 7638 | 8458 | 9257 | 9935 |
| 0594 | 1519 | 2365 | 3046 | 3804 | 4670 | 5654 | 6664 | 7717 | 8460 | 9294 | 9953 |
| 0610 | 1528 | 2422 | 3050 | 3824 | 4678 | 5737 | 6667 | 7728 | 8558 | 9311 | 9989 |
| 0660 | 1589 | 2426 | 3138 | 3833 | 4895 | 5751 | 6685 | 7756 | 8648 | 9386 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# भाजपा उमेदवारावरून महाजन व खडसेत वाद

■ जळगाव

**जळगाव** विधानपरिषदेसाठी भाजपा उमेदवार नंदकिशोर महाजन हे मंत्री गिरीश महाजन यांचे उमेदवार असल्याचे केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी म्हटल्यावर दोघात जुगलबंदी रंगली. भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत महायुतीचा मेळावा झाला. त्यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी उमेदवार महाजन यांच्याबद्दल वक्तव्य केल्याने या उमेदवाराबाबत नाराजी चव्हाट्यावर आल्याचे दिसले. महायुतीच्या मेळाव्यात रवींद्र चव्हाण यांच्यासह पालकमंत्री गुलाबराव पाटील, मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्यासह जिल्ह्यातील भाजपा, शिवसेना (शिंदे गट) व अजित पवार गटाचे सर्व आमदार व जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. त्यावेळी विधानपरिषदेचे भाजपाचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्या उमेदवारीचा निर्णय गिरीश महाजन यांचा असल्याचे रक्षा खडसे म्हणाल्या तर गिरीश महाजन यांनी उमेदवारीचा निर्णय वरिष्ठांचा असल्याचे व उमेदवार माझा नसून पक्षाचा आहे असे सांगितल्याने ठिणगी पडली. मंत्री महाजन म्हणाले की, नंदकिशोर महाजन हे पक्षाचे उमेदवार आहेत. त्यांना गिरीश महाजन यांचा उमेदवार म्हणणे किंवा त्यावर माझा शिक्का मारणे चुकीचे आहे.

# वाढवण बंदरासाठी जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू

■ पालघर

**डहाणू** तालुक्यात प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ग्रीनफिल्ड महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली असून, यासाठी सुमारे ५३ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. या जमिनीचा ताबा घेण्याची प्रक्रिया आजपासून प्रशासनाकडून सुरू करण्यात आली. जमीन ताब्यात घेताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच संभाव्य तणाव टाळण्यासाठी वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीच्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. वाढवण बंदर प्रकल्पाला स्थानिक मच्छीमार, शेतकरी आणि पर्यावरणवादी संघटनांकडून तीव्र विरोध कायम आहे. 'वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती', माकप आणि किसान सभेच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पाविरोधात यापूर्वीही अनेक धरणे आंदोलने, भव्य आक्रोश मोर्चे व निदर्शने करण्यात आली होती.

# ग्राहकांच्या तक्रारींमध्ये स्मार्ट मीटरमुळे मोठी घट

■ मुंबई

**राज्यात** महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत.

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल ॲपद्वारे दर तासाला त्याचा वीज वापर मोबाईल फोनवर समजतो. त्यामुळे वीजबिलाबाबत पारदर्शिता राहते.स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते.स्मार्ट मीटरच्या ॲपद्वारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो. ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल पद्वारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

# कंटेनर-दुचाकीचा अपघात दोन मित्रांचा जागीच मृत्यू

■ जुन्नर

**अहिल्यानगर-कल्याण** महामार्गावर ओतूर जवळील डुंबरवाडी हद्दीत मध्यरात्री कंटेनर आणि दुचाकीची समोरासमोर जोरात धडक झाली. त्यात दोघे मित्र जागीच ठार झाले.

या अपघातातील मृतांची नावे -प्रणव नितीन डुंबरे व गणेश विजय गाडेकर अशी आहेत.हे जुन्नर तालुक्यातील ओतूर आणि डिंगोरे येथील राहणारे होते. शनिवारी रात्री सव्वा अकराच्या सुमारास डुंबरवाडी गावच्या हद्दीत नगर-कल्याण महामार्गावरील किगा आईस्क्रीमसमोर हा अपघात घडला. आळेफाटा बाजूकडून ओतूरकडे जाणारी यामाहा मोटरसायकल आणि कल्याणकडून नगरकडे जाणारा कंटेनर यांच्यात जोरदार धडक झाली.

# पक्ष फोडण्यापेक्षा तुमची मुले मोठी करा शर्मिला ठाकरे यांचा भाजपावर निशाणा



■ मुंबई

**मनसे** अध्यक्षांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या पार्श्वभूमीवर त्यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी काही महिलांना घरगुती चक्क्यांचे वाटप केले. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी भाजपावर जोरदार टीका केली. 'पक्ष फोडण्यापेक्षा तुमची स्वतःची मुले मोठी करा,' असा टोला लगावत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

सत्ताधाऱ्यांकडून 'ऑपरेशन टायगर' राबवले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर शर्मिला ठाकरे यांनी टीका करत म्हटले की, त्यांना फक्त इतर पक्ष फोडायचे आहेत त्यापेक्षा तुम्ही तुमची मुले मोठी करा. दुसऱ्यांची मुले चोरण्यापेक्षा भारतीय जनता पक्ष, संघ आणि विश्व हिंदू परिषद यांच्यात काम करणारी अनेक चांगली माणसे आहेत, त्यांना पुढे आणा. त्यांनी फक्त दुसऱ्यांच्या सतरंज्याच उचलायच्या का? आतापर्यंत ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचा पक्ष फोडला. आम्ही आमच्या पक्षात नवीन नेतृत्व तयार करतो तसे तुम्हीही ते करून दाखवा.

उद्धव ठाकरे यांच्या बैठकीला पाच खासदार गैरहजर होते, यावर त्या म्हणाल्या की, प्रत्येकाच्या वैयक्तिक कारणांमुळे अनुपस्थिती असू शकते. पाच खासदार आले नाहीत म्हणजे ते पक्ष सोडून गेले, असा अर्थ होत नाही. तसेच उपस्थित असलेलेही जाणार नाहीत, याची हमी देता येत नाही.

# स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या उपक्रमांचे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान

फडणवीस यांचे प्रतिपादन

■ मुंबई

**स्टँडर्ड** चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

फडणवीस म्हणाले की,राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत.

जलसंवर्धन,ग्रामीण विकास,महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे.बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून जलसंधारण,आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये आणि राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले.

राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# प्रियकर लग्न करत नसल्याने तरुणी चढली टॉवरवर ! तीन तासांनी खाली आणले

■ वसई

**प्रियकर** लग्न करत नसल्याने तरुणी चक्क विजेच्या मनोऱ्यावर चढून बसली होती. वसई पूर्वेच्या मधुबन परिसरात ही नाट्य रंगले. पोलिसांनी तिच्या प्रियकराला बोलावले आणि त्याने लग्नाचे आश्वासन दिल्यानंतर ३ तासांनी तिला खाली आणण्यात यश आले.

रविवारी दुपारी एकच्या सुमारास वसई पूर्वेच्या मधुबन परिसरात असलेल्या एका विजेच्या मनोऱ्यावर एक २२ वर्षीय तरुणी चढली. 'माझा प्रियकर माझ्याशी लग्न करत नाही त्यामुळे मी वरून उडी मारून आत्महत्या करेन' अशी धमकी ती देत होती. यावेळी पोलिसांची तारांबळ उडाली. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले. तिला खाली उतरविण्यासाठी मनधरणी लागले. पण ती कुणी वर आल्यास उडी मारेन अशी धमकी देत होती पोलिसांनी तिचे समुदेशन केले व तिच्या प्रियकरला बोलावून घेतले. त्याने लग्न करतो असे आश्वासन दिले. त्यानंतर तरुणी खाली आली. सुमारे तीन तास ही नाट्य रंगले होते. आम्ही दोघांच्या कुटुंबियांशी आम्ही संपर्क केला. दोघे लग्न करण्यास तयार आहेत. मुलीला सुखरूप तिच्या पालकांकडे सोपविण्यात आले आहे.

# २८ जानेवारीपासून पुण्यात रंगणार शंभरावे मराठी साहित्य संमेलन

महामंडळाची पत्रकार परिषदेत घोषणा

■ पुणे

**अखिल** भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित केले आहे. हे संमेलन चार दिवसांचे असून ते ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी संमेलनाचे संयोजक, समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते. महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात पार पडली.या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.यापूर्वी १३ जून रोजी स्थळ निवड समितीने एस. पी. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती. या पाहणीमध्ये योगेश सोमण,उपाध्यक्ष पुरुषोत्तम सप्रे,कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, डॉ. रामचंद्र काळुंखे, प्रा. प्रतिभा सराफ आणि लखनसिंह कटरे सहभागी झाले होते.

# मालवणच्या बिळवसमध्ये २६ जुलैला सातेरीचा जत्रोत्सव

■ मालवण

मसुरे गावची 'मूळमाया' अशी ओळख असलेल्या बिळवस येथील श्री देवी सातेरी जलमंदिरचा वार्षिक जत्रोत्सव २६ जुलै रोजी साजरा होत आहे. आषाढ महिन्याच्या पवित्र दिवसांत पावसाच्या सरींमध्ये होणारा हा जिल्ह्यातील एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि एकमेव जत्रोत्सव असल्याने संपूर्ण सिंधुदुर्गात आणि भाविकांमध्ये याविषयी प्रचंड उत्सुकता आहे. २६ जुलै रोजी जत्रोत्सवाच्या दिवशी सकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि मंत्रोच्चारात देवीचे विधीवत अभिषेक व पूजन करून होताच भाविकांसाठी दर्शन खुले होईल. सुवासिनींकडून देवीची खणानारळाने ओटी भरणे, तसेच वर्षभरातील नवस फेडण्याच्या धार्मिक विधींना प्रारंभ होईल.

# देशात बुलेट ट्रेनसाठी पहिल्यांदाच 'टनेल हुड्स' तंत्रज्ञानाचा वापर



■ मुंबई

**देशातील** सर्वात हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरमध्ये पहिल्यांदाच 'टनेल हुड्स' हे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात येत आहे. या माध्यमातून ३०० किमी प्रतितासाहून अधिक वेगाने धावणाऱ्या ट्रेनमुळे निर्माण होणारा प्रचंड हवेचा दाब, आवाज आणि 'टनेल बूम' प्रभाव नियंत्रित केला जाणार आहे. डोंगराळ भागातील बोगद्यांच्या प्रवेशद्वारांवर ही प्रणाली बसवली जात असून, हाय-स्पीड ट्रेनच्या प्रवासाला अधिक सुरक्षित,आरामदायी बनवण्याचा या तंत्रज्ञानाचा उद्देश आहे.

३०० किमी प्रतितास किंवा त्याहून अधिक वेगाने धावणारी बुलेट ट्रेन बोगद्यात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना हवेच्या दाबात मोठे बदल होतात. या प्रक्रियेमुळे 'टनेल बूम' म्हणजेच धडधडणारा आवाज आणि दाब लहरी निर्माण होण्याची शक्यता असते. हे परिणाम कमी करण्यासाठी 'टनेल हूड्स' ही प्रगत रचना वापरली जात आहे. ही प्रणाली बोगद्याच्या प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या भागात संक्रमण क्षेत्र तयार करते. त्यामुळे हवा अचानक दाबली किंवा सोडली न जाता, ती हळूहळू प्रवाहित होते. त्यामुळे दाबातील तीव्र बदल नियंत्रित होतात आणि प्रवाशांना अधिक स्थिर व आरामदायी प्रवास अनुभवता येतो.

तज्ज्ञांच्या मते, या तंत्रज्ञानामुळे बोगद्याजवळ राहणाऱ्या नागरिकांना होणारा ध्वनी प्रदूषणाचा त्रासही कमी होईल. तसेच ट्रेनच्या वेगामुळे निर्माण होणाऱ्या वायुगतिकीय परिणामांवर नियंत्रण ठेवून प्रणालीची कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढवली जाते.

# महावितरण खासगी कंपन्यांना विकण्याची तयारी! निविदा जारी

■ मुंबई

**राज्यातील** कोट्यवधी वीज ग्राहकांना हक्काची वीज पुरविणारी महावितरण या शासकीय कंपनीचे आता खासगीकरण करण्याचे महायुती सरकारने ठरविले असून लवकरच महावितरणचे समभाग विक्रीला काढण्यात येणार आहेत.

यामुळे महावितरणमध्ये कार्यरत हजारो अधिकारी व कर्मचारी यांच्या नोकरीवर संकट निर्माण झाले आहे. यामुळे महावितरण कर्मचा-यांमध्ये भविष्याबद्दल अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

समभाग विक्री (आयपीओ) करण्यासाठी राज्य सरकारने महावितरणने पहिला टप्पा म्हणून मर्चंट बँकेची नियुक्ती करण्यासाठी निविदा २७ मे रोजी जारी केली आहे. या निविदेच्या माध्यमातून मर्चंट बँकेची नेमणूक करून महावितरणचे भाग भांडवल (शेअर कॅपिटल) विकण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. संपूर्ण महावितरण कंपनी ही खासगी भांडवलदारांच्या घशात घालण्याच्या दिशेने हे पहिले पाऊल असल्याची चर्चा या कंपनीच्या उच्चपदस्थांमध्ये आहे. त्यामुळे महावितरणमध्ये कार्यरत असलेले हजारो अधिकारी व कर्मचारी यांची भविष्यात कपातीच्या नावाखाली नोकरी जाण्याची शक्यता आहे.

महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर महावितरणचे खासगीकरण करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी मॅकेंझी या आंतरराष्ट्रीय सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यात आली. मॅकेंझी ही कंपनी सरकारी कंपन्यांचे खासगीकरण करण्यात तज्ञ आहे. यासाठी मॅकेंझीला महावितरणची सर्व संवेदनशील आर्थिक व वाणिज्यिक माहिती देण्यात आली आहे. मॅकेंझी ही एक वादग्रस्त कंपनी असून याच कंपनीने एन्रॉनची सल्लागार कंपनी म्हणून भारतात काम केले होते. एन्रॉनने १९९४ च्या काळात तत्कालिन एमएसईबीला (महावितरणची मूळ कंपनी) आर्थिक डबघाईस आणण्यासाठी लवादाकडे धाव घेतली. यातून संपूर्ण एमएसईबी बोर्डचे अस्तित्व धोक्यात आले होते.

जर एन्रॉन कंपनी बुडाली नसती तर त्या काळात एमएसईबीवर त्यांनी संपूर्ण ताबा मिळवला असता.

# दिनेश नामदेव जगताप यांची नियुक्ती भटके विमुक्त मोर्चाचे मुंबई भाजपा महामंत्री

■ मुंबई

**भारतीय** जनता पार्टीच्या वतीने भटके विमुक्त मोर्चाचे स्नेहसंमेलन दादर येथील वसंत स्मृती कार्यालयात ८ जून रोजी संपन्न झाले. स्नेहसंमेलनात भाजपा मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी भटके विमुक्त मोर्चाचे समाज बांधवांना मार्गदर्शन केले आणि समाजाचे प्रलंबित असलेले प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला.



याप्रसंगी अमित साटम यांच्या हस्ते भटके विमुक्त समाजाकरिता करीत असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत दिनेश नामदेव जगताप यांची भाजपा भटके विमुक्त मोर्चाचे मुंबई महामंत्रीपदी नियुक्ती करून विशेष सत्कार करण्यात आला.

# 'महांकाली' कारखाना सुरू करण्याच्या हालचालींना वेग

सर्वतोपरी सहकार्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ सांगली

**आर्थिक** अडचणींमुळे आणि थकित कर्जामुळे बंद पडलेला कवठेमहांकाळ येथील महांकाली सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे.हा कारखाना सुरू करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करताना दिली आहे. कारखान्याच्या चेअरमन अनिता सगरे यांनी' महांकाली सुरू करण्याबाबत मुख्यमंत्र्याशी सविस्तर चर्चा केली.यावेळी महांकाली सुरू करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.यामुळे महांकाली कारखाना सुरू करण्याबाबतच्या हालचालीना गती मिळाली आहे. कवठेमहांकाळ येथील महांकाली साखर कारखाना लवकरात लवकर सुरू व्हावा. आगामी कालावधीत कारखाना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागावे,

कोणतीही अडचण असल्यास राज्य शासन व आपण स्वतः मदत करू अशी स्पष्ट भूमिका व्यक्त केल्याची माहिती समोर आली आहे.मुख्यमंत्र्यांना भेटलेल्या शिष्टमंडळात कारखान्याच्या चेअरमन अनिता सगरे यांच्यासह जनसुराज्य पार्टीचे संस्थापक आमदार विनय कोरे, जनसुराज्य पार्टीचे प्रदेशाध्यक्ष समित कदम, युवा नेते शंतनु भैय्या सगरे आदींसह कारखान्याचे संचालक, पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ८ रुपये किलो दराने मोसंबी विक्री शेतकऱ्याकडून ४५० झाडांवर जेसीबी

■ सिल्लोड

**सिल्लोड** तालुक्यातील पिंपळगाव पेठ येथे मोसंबीच्या अत्यल्प दरामुळे शेतकऱ्याने संपूर्ण बाग उद्ध्वस्त केल्याची हृदयद्रावक घटना घडली. खेमचंद फुले या शेतकऱ्याने ४ वर्ष मेहनत केलेली १ हेक्टर क्षेत्रातील ४५० मोसंबी झाडांवर जेसीबी चालवला.

२०२१ मध्ये मोठ्या अपेक्षेने आणि लाखो रुपयांचा खर्च करून त्यांनी मोसंबीची लागवड केली होती. ठिबक सिंचन, रोपे, खत, औषधे, कुंपण आणि देखभालीवर मोठी गुंतवणूक केली होती. सुरुवातीला बाग चांगली बहरली व उत्पादनही समाधानकारक मिळू लागले होते. मात्र काही वर्षांपासून बाजारात मोसंबीला अत्यंत कमी दर मिळू लागले. सुरुवातीला १५ ते २० रुपये किलो असलेला दर यावर्षी थेट ८ रुपये किलोपर्यंत घसरल्याने शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला.

# स्वयंसेवकांच्या कार्यक्रमात कुलगुरू सहभागी केरळच्या विरोधी पक्षनेत्यांकडून टीका

■ तिरुवनंतपुरम

**केरळचे** मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीसन यांनी स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झालेल्या संघाच्या शताब्दी वर्षानिमित्ताच्या कार्यक्रमात तीन विद्यापीठांच्या कुलगुरूंनी सहभाग घेतल्याबद्दल टीका करत त्यांच्याकडून माफीची मागणी केली.

फेसबुकवरील पोस्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, कुलगुरूंचा या कार्यक्रमातील सहभाग, त्यानंतर त्यांच्या पदाला साजेसा नसून केरळच्या शैक्षणिक परंपरांशी विसंगत आहे. शनिवारी तिरुवनंतपुरम येथे झालेल्या आरएसएसच्या शताब्दी वर्ष सोहळ्यात केरळ, महात्मा गांधी आणि मल्याळम विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात तीन कुलगुरूंनी सहभाग घेतल्याची बाब अत्यंत गंभीरतेने पाहिली जात आहे. त्यांनी मोठी चूक केली आहे. सांप्रदायिकतेला प्रोत्साहन देणारी कोणतीही कृती कोणाकडूनही झाली तरी ती स्वीकारली जाणार नाही. सांप्रदायिकतेला खतपाणी घालणारी कोणतीही कृती मान्य केली जाणार नाही.ती सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विरोधी पक्षनेते सतीसन म्हणाले की, केरळ समाज कुलगुरू पदाकडे अत्यंत आदराने पाहतो. मात्र, अतिरेकी सांप्रदायिक विचार मांडणाऱ्या आरएसएस नेत्याच्या कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांनी त्या पदाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवला आहे. केरळ समाजाला कुलगुरू पदाबद्दल मोठा आदर आहे. अतिरेकी सांप्रदायिकतेचे समर्थन करणाऱ्या आरएसएस नेत्याच्या कार्यक्रमात त्यांचा सहभाग या पदाच्या प्रतिष्ठेशी सुसंगत नाही, असे ते म्हणाले.

# काँग्रेस उमेदवार हर्षजीत देशमुखांना डिस्चार्ज! ऑनलाईन प्रचार करणार

■ अमरावती

**अमरावती** विधानपरिषद निवडणुकीतील काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. मात्र प्रकृती अस्वस्थतेमुळे ते प्रत्यक्ष प्रचारात सहभागी होऊ शकणार नसून आता ऑनलाईन माध्यमातून प्रचार करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

वैद्यकीय तपासणीत देशमुख यांना किडनी स्टोनचा त्रास असल्याचे निष्पन्न झाले आहे. डॉक्टरांनी त्यांना किमान आठ दिवस पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. त्यामुळे ते मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी आणि प्रचार दौऱ्यांपासून दूर राहणार आहेत. डिस्चार्जनंतर देशमुख म्हणाले की, अचानक प्रकृती बिघडल्यामुळे काही गैरसमज आणि आरोप-प्रत्यारोप झाले, मात्र त्यात तथ्य नसून पक्षातील वरिष्ठ नेते माझ्या पाठीशी ठामपणे उभे आहेत.

# शेतकरी कर्जमुक्तीसाठी आता उबाठाचे आंदोलन

■ मुंबई

**शेतकऱ्यांच्या** सरसकट व विनाअट कर्जमुक्तीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनानंतर आता उबाठानेही सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. उद्या मराठवाडाभर 'बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली' काढण्यात येणार आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली होणार आहे. 'नको अटी, नको शर्ती, आम्हाला द्या संपूर्ण कर्जमुक्ती' या घोषवाक्याखाली मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर सकाळी १० वा. ट्रॅक्टर रॅली काढण्यात येणार आहे.

नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती व वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यातच शेतीमालाला मिळणारे कमी दर, बनावट बियाणे व खतांचा प्रश्न, खऱ्या खतांचा तुटवडा, अपुरा वीजपुरवठा व पीकविमा कंपन्यांकडून होणारी फसवणूक यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे कोणत्याही अटी-शर्तींशिवाय संपूर्ण कर्जमाफी देण्याची मागणी पक्षाने केली आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# युद्ध थांबले! खदखद कायम

**गेले** १०५ दिवस सुरू असलेले अमेरिका-इराणमधील युद्ध थांबल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. तर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची यांनीदेखील युद्ध समाप्तीच्या करारावर लवकरच सह्या होतील, असा दुजोरा दिला आहे. यापूर्वीसुद्धा दोघांनी शस्त्रसंधीची घोषणा केली होती. परंतु ती फार काळ टिकली नाही. त्यानंतरही एकमेकांवर हल्ले होत राहिले. आतादेखील डोनाल्ड ट्रम्प यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून युद्ध समाप्त झाल्याचे सांगितले जाते आहे. पुढच्या चार पाच दिवसांमध्ये या संदर्भातल्या करारावर सह्या होतील आणि दोन्ही देशांमध्ये पुढच्या सहा महिन्यात निश्चित स्वरूपाची समझोत्याची कागदपत्रे तयार होतील. युद्धबंदीची घोषणा झाल्याबरोबर जगभरातल्या सगळ्याच देशांनी घोषणेचे स्वागत केले आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीदेखील मोठी घसरण नोंदवली गेली तर दुसरीकडे युद्ध थांबल्याचे निमित्त साधून भारतातल्या सोन्या-चांदीच्या किमतीमध्ये प्रती तोळा २७०० आणि चांदीच्या प्रती किलोत दहा हजार रुपयाची वाढ नोंदली गेली. आता प्रत्यक्षात कच्च्या तेलाच्या किमती खाली आल्यानंतर भारतातल्या इंधनाच्या किमतीत किंवा घरगुती गॅस सिलिंडरच्या किमती किती वेगाने खाली येतात हे येणाऱ्या काही दिवसांत कळेल. परंतु डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतःच या युद्ध समाप्तीची घोषणा करताना आता फेरव्यापार पूर्वीसारखा मुक्तपणे होऊ द्या, अशा प्रकारचे विधान केलेले आहे. दोन्ही देशांमधल्या युद्धबंदीच्या करारातल्या नेमक्या अटी आणि शर्ती काय आणि कशा स्वरूपाच्या आहेत. हेदेखील येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. परंतु प्रामुख्याने दोन्ही देशांमधले युद्ध थांबत असताना कोणी नेमकी माघार घेतली हे स्पष्ट होत नाही. इराणने मात्र आम्हीच हे युद्ध जिंकल्याचा दावा केला आहे तर अमेरिकेने या १०५ दिवसांत इराणचे प्रचंड नुकसान झाल्याचे सांगून इराणकडून प्रामुख्याने अणुशस्त्रांबाबत निश्चित आश्वासन मिळाल्याचाही दावा केला आहे. अर्थातच यासंदर्भात इराणने अमेरिकेला कोणतेही ठोस आश्वासन दिलेले नाही.

**इंधनाचे दर कमी होणार**

संपूर्ण जगासाठी चिंतेची बाब ठरलेले हे युद्ध काही प्रमुख मुद्यावर सहमती होऊन थांबत असेल तर ते सगळ्या जगाच्याच हिताचे ठरते. दोन्ही देशांमध्ये करारावर चौदा कलमे निश्चित केले गेल्याचे सांगितले जाते. ज्या कारणावरून युद्ध पेटले होते तो इराणकडच्या अण्वस्त्रांचा मुद्दा अजूनही प्रमुख मुद्दा ठरू शकतो. इराणने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, आमच्याकडचा अण्वस्त्र कार्यक्रम हा अणुऊर्जा बनवण्यासाठी आहे. इराणच्या या आश्वासनावर अमेरिकेला आता विश्वास ठेवणे भाग पडलेले दिसते. याशिवाय इराणची बऱ्याच नौसैनिक तळांची नाकेबंदी अमेरिकेने केली होती. ती उठवली जाईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे होर्मुजच्या सामुद्रधुनीतून पूर्वीसारखा मुक्तपणे व्यापार सुरू होईल. इराणनेदेखील त्याला सहमती दर्शवली आहे. या युद्धबंदीचा इराणला सर्वाधिक दिलासा मिळणार असून गेल्या तीन चार महिन्यांपासून विस्कळीत झालेली आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था नव्याने उभी करण्यामध्ये बराच कालावधी जाणार आहे. म्हणूनच इराणला या युद्धबंदीचे विश्वासपूर्ण ठोस आश्वासन हवे आहे. एकीकडे इराण अमेरिकेमध्ये युद्धसमाप्तीची बोलणी होत असताना त्यात इस्त्रायलला सहभागी करून घेतलेले नाही. इस्त्रायल इराणवर अजूनही हल्ले करू शकतो. अशी स्थिती नाकारता येत नाही. परंतु अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यातले मैत्रीसंबंध लक्षात घेता इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू हे ट्रम्प यांच्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देतील असे म्हटले जाते. याचा अर्थ युद्धसमाप्तीची घोषणा होत असताना काही महत्त्वाच्या मुद्यावर पूर्ण सहमती होण्यासाठी बराच मोठा कालावधी लागू शकतो. पूर्ण सहमती होऊन भविष्यकाळात युद्ध न करण्याचे दोन्ही देश जेव्हा मान्य करतील त्याचवेळी खऱ्या अर्थाने युद्धबंदीचे परिणाम दिसू शकतील. आज युद्ध थांबले असले तरी दोन्ही देशांमधली खदखद कायम राहील अशीच चिन्हे दिसतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केला तर ट्रम्प यांच्याबाबतीत किती विश्वास दाखवायचा हा सगळ्यांपुढे प्रश्न असतो. म्हणून संघर्ष जरी थांबला तरी एकमेकांमधल्या विश्वासाचे काय हे प्रश्न कायम राहू शकतात.

**तीन भारतीयांच्या मृत्यूचे काय ?**

यातला इराणला तातडीने मिळणारा दिलासा म्हणजे इराणची बरीच संपत्ती गोठवली गेली होती. ती आता मुक्त होईल आणि एकूणच तिथल्या अर्थव्यवस्थेसाठी ती महत्त्वपूर्ण ठरेल. या युद्धाचे जागतिक परिणाम सगळ्याच देशांना भोगावे लागले आहेत. भारताला त्याचा बऱ्यापैकी फटका बसला. जवळपास साठ ते सत्तर टक्के इंधनाची आयात भारताला आखाती देशातून करावी लागते. त्याच्यावर बराच परिणाम झाला होता. युद्धसमाप्तीनंतर भारताची ही महत्त्वपूर्ण इंधनसमस्या संपुष्टात येईल. भारतातल्या सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारी इंधनटंचाईदेखील समाप्त होऊ शकते. युद्धसमाप्तीचा भारतासाठी हा सर्वात मोठा दिलासा ठरतो. मात्र अगदी गेल्या आठवड्यात अमेरिकेने पुन्हा इराणवर हल्ले केले ते करत असताना होर्मुजमध्ये असलेल्या भारतीय जहाजावरही अमेरिकेकडून हल्ला झाला ज्यामध्ये भारताच्या एका व्यापारी जहाजावरचे तीन कर्मचारी ठार झाले. या प्रकाराबाबत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने बाळगलेले मौन तितकेच धक्कादायक ठरते. खरे तर या हल्ल्याच्या संदर्भात अमेरिकेकडे योग्य पद्धतीने निषेध नोंदवला जाणे आवश्यक होते. युद्धजन्य परिस्थितीत भारताला इंधनपुरवठा सुरळीत राहाण्यासाठी काही जोखमी स्वीकाराव्या लागल्या होत्या. त्यातली ही एक मोठी जोखीम होती. या दोन्ही देशांच्या संघर्षात भारताचे झालेले नुकसान दुर्लक्षित करता येत नाही. खरे तर अमेरिकेने स्वतःच या हल्ल्याच्या संदर्भात निदान सांत्वन आणि दिलगिरीसुद्धा व्यक्त करणे अपेक्षित होते. म्हणजेच या युद्धाचे परिणाम भोगत असताना भारताने आपले कमीत कमी नुकसान होईल, याची दक्षता घ्यायला हवी होती.

## सुविचार

विलास कोळेकर
मालेवाडी, जि. सांगली. मोबा.९४२२४२०६११


चैत्रातील झळ सहन केल्याशिवाय मृगातील रिमझिमचा आनंद द्विगुणीत होत नाही. तसेच जीवनात संकटांची वादळे झेलल्याशिवाय सुखाचा गारवा कळत नाही.

## पंचांग

मंगळवार, १६ जून २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर

* निज ज्येष्ठ शुक्ल द्वितीया
नक्षत्र : आर्द्रा

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मिथुन



रवी उदय- ०६-०३
रवी अस्त- १९-१६

निज ज्येष्ठ मासारंभ, नूतन चंद्रदर्शन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती


### फ्रूट कस्टर्ड

★ **साहित्य :-** २ कप फुल फॅट दूध, २ कप बारीक चिरलेली हंगामी फळे, १ टीस्पून व्हॅनिला इसेन्स, २ टेबलस्पून कॉर्नफ्लोअर, चिमूटभर पिवळा फूड कलर (ऐच्छिक), साखर चवीनुसार.

★ **कृती :-**
सुरुवातीला आपल्या आवडीची फळे स्वच्छ धुऊन बारीक चिरून घ्या. ही फळे काही वेळ फ्रीजमध्ये ठेवल्यास कस्टर्ड अधिक थंडगार आणि स्वादिष्ट लागतो. यानंतर एका भांड्यातील थोडे दूध वेगळे काढून ठेवा आणि उरलेले दूध मंद आचेवर गरम करायला ठेवा. दूध गरम झाल्यानंतर त्यात साखर घालून नीट ढवळा. वेगळे काढलेल्या दुधात कॉर्नफ्लोअर, व्हॅनिला इसेन्स आणि फूड कलर मिसळून गाठी न राहतील याची काळजी घ्या. हे मिश्रण गरम दुधात हळूहळू घालत सतत ढवळत राहा. काही मिनिटांत मिश्रण घट्ट होऊ लागेल. इच्छित घट्टपणा आल्यावर गॅस बंद करून कस्टर्ड पूर्णपणे थंड होऊ द्या. नंतर त्यात चिरलेली फळे मिसळा आणि सर्व्ह करण्यापूर्वी काही वेळ फ्रीजमध्ये ठेवा. कस्टर्ड गरम असताना थोडा पातळ वाटू शकतो, पण थंड



झाल्यावर तो आपोआप घट्ट होतो. सफरचंद, द्राक्षे, डाळिंब, केळी, चिकू, आंबा यांसारखी विविध फळे वापरल्यास चव अधिक खुलते. फळे घालण्यापूर्वी कस्टर्ड पूर्णपणे थंड झाल्याची खात्री करा.
सर्व्ह करताना वरून ड्रायफ्रूट्स किंवा चेरी घातल्यास डेझर्ट अधिक आकर्षक दिसतो.




# स्वीडनने ट्युनिशियाचा ५-१ ने धुव्वा उडवला

## इसाक आणि ग्योकेरेसची दमदार कामगिरी

**फिफा विश्वचषकातील 'एफ' गटाच्या सामन्यात स्वीडनने ट्युनिशियाचा ५-१ असा धुव्वा उडवून दमदार विजयी सलामी दिली. मॉन्टेरी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यावर स्वीडनने पूर्णपणे वर्चस्व गाजवून ट्युनिशियाला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिलीच नाही. यासीन अयारी, अलेक्झांडर इसाक आणि व्हिक्टर ग्योकेरेस यांनी स्वीडनसाठी उत्कृष्ट कामगिरी करुन संघाच्या या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.**



■ मॉन्टेरी

**पहिल्या** हाफमध्ये बॉक्सबाहेरून मारलेल्या एका शानदार शॉटने स्वीडनने १-० अशी आघाडी घेतली. त्यानंतर लगेच व्हिक्टर ग्योकेरेसच्या एका उत्कृष्ट पासवर अलेक्झांडर इसाकने गोल करून २-० अशी आघाडी मिळवली. स्वीडनने आक्रमण सुरूच ठेवले आणि ट्युनिशियाला आक्रमण करण्याची कोणतीही संधी दिली नाही. मात्र ट्युनिशियाने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला आणि हॅनिबल मेजब्रीच्या क्रॉसवर ओमर रेकिकने हेडरद्वारे आपल्या संघाचा पहिला गोल केला. रेकिकच्या गोलने ट्युनिशियन चाहत्यांच्या आशा पल्लवित केल्या आणि पहिल्या हाफमध्ये स्कोअर २-१ वर आला. दुसऱ्या हाफमध्ये स्वीडनने जोरदार खेळ करुन सामन्याला एकतर्फी बनवले.

ट्युनिशियाच्या बचावातील चुकीचा फायदा घेऊन अलेक्झांडर इसाकने बॉल हिसकावून घेतला आणि तो व्हिक्टर ग्योकेरेसकडे पास केला. त्यानंतर ग्योकेरेसने सहज गोल करून स्कोअर ३-१ असा केला. त्यानंतर बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या मॅटियास स्वानबर्गने स्वीडनचा चौथा गोल करून ट्युनिशियाच्या पुनरागमनाच्या आशा धुळीस मिळवल्या. स्वीडनचा आक्रमक खेळ इथेच थांबला नाही. सामन्याच्या अंतिम क्षणी यासिन अयारीने आणखी एका उत्कृष्ट लांब पल्ल्याच्या शॉटने आपला दुसरा गोल करून संघाचा ५-१ असा प्रभावी विजय निश्चित केला.

**१७ जूनचे विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| रात्री १२.३० | फ्रान्सविरुद्ध सेनेगल |
| मध्यरात्री ३.३० | इराकविरुद्ध नॉर्वे |
| सकाळी ६.३० | अर्जेंटिनाविरुद्ध अल्जेरिया |
| सकाळी ९.३० | ऑस्ट्रियाविरुद्ध जॉर्डन |
| रात्री १०.३० | पोर्तुगालविरुद्ध काँगो प्रजासत्ताक |

## अमाद डायलोचा ९० व्या मिनिटाला गोल आयव्हरी कोस्टचा इक्वेडोरवर १-० ने विजय

■ फिलाडेल्फिया



१२ वर्षांनंतर विश्वचषकामध्ये पुनरागमन करणाऱ्या आयव्हरी कोस्टने अत्यंत चुरशीच्या लढतीत इक्वेडोरवर १-० असा ऐतिहासिक विजय मिळवला. आयव्हरी कोस्टचा स्टार खेळाडू अमाद डायलोने ९० व्या मिनिटाला गोल करून आयव्हरी कोस्टचे संघाला विजय मिळवून दिला.

हा सामना ६८,२७४ प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळला गेला. इक्वेडोरचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने त्यांना घरच्या मैदानासारखा पाठिंबा मिळत होता. सामन्यात दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केला. दोन्ही संघांचे मिळून एकूण तीन फटके क्रॉसबारवर आदळले, ज्यामुळे सामना अधिक उत्कंठावर्धक झाला.

सामन्याचे चित्र ५६ व्या मिनिटाला बदलले, जेव्हा अमाद डायलो बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला. ९० व्या मिनिटाला विल्फ्रेड सिंगोने उजव्या बाजूने केलेल्या शानदार पासचा फायदा घेऊन डायलोने डाव्या पायाने अचूक शॉट लगावला. इक्वेडोरचा गोलकीपर हर्नान गॅलिंडेझला यावर कोणताही उपाय करता आला नाही आणि बॉल थेट जाळीत विसावला.

## दोहा डायमंड लीगमध्ये नीरज चोप्रा पुनरागमन करणार

■ नवी दिल्ली

**भारताचा** स्टार भालाफेकपटू आणि दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा दोहा डायमंड लीगमध्ये पुनरागमन करणार आहे. या लीगचा दोहा येथील टप्पा १९ जून रोजी होणार आहे. नीरजने २०२५ च्या जागतिक चॅम्पियनशिपमध्ये निराशाजनक आठवे स्थान मिळवल्यापासून कोणतीही स्पर्धा खेळलेली नाही.

दोहा डायमंड लीगमधील भालाफेक स्पर्धेच्या संघात नीरजच्या नावाचा समावेश आहे. गेल्या वर्षी याच स्पर्धेत त्याने ९० मीटरचा टप्पा ओलांडला होता. नीरज सध्या स्वित्झर्लंडमधील बिएन येथे त्याचा फिजिओ इशान मारवाहा आणि प्रशिक्षक जय चौधरी यांच्यासोबत ४७ दिवसांच्या ऑफ-सीझन प्रशिक्षण शिबिरात सहभागी होत आहे.

## नेदरलँडविरुद्ध दाइची कामाडाने टाळला जपानचा पराभव! सामना २-२ ने बरोबरीत

■ डॅलस

**फिफा** विश्वचषकाच्या गट 'एफ' मधील नेदरलँड आणि जपान यांच्यातील रोमांचक सामना २-२ असा बरोबरीत संपला. डॅलस स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात नेदरलँड संघाने दोनदा आघाडी घेतली होती, मात्र जपानने प्रत्येक वेळी जोरदार पुनरागमन करून नेदरलँडची आघाडी फोडून काढली. सामन्यातील ८८ व्या मिनिटाला दाइची कामाडाने जपानसाठी बरोबरीचा गोल केला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच नेदरलँडने बॉलवर अधिक चांगले नियंत्रण ठेवले होते. डोनिएल मालेनला गोल करण्याच्या दोन चांगल्या संधी मिळाल्या. परंतु जपानचा गोलकीपर गिओन सुझुकीने उत्कृष्ट बचाव करून संघाला आघाडी घेण्यापासून रोखले. दुसरीकडे जपानने संयमित बचावात्मक रणनीती अवलंबली आणि प्रति-हल्ल्यांद्वारे संधी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तथापि पहिल्या ४५ मिनिटांत दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले आणि मध्यंतरापर्यंत स्कोअर ०-० राहिला.

दुसऱ्या हाफच्या सुरुवातीनंतर अवघ्या ५ मिनिटांतच नेदरलँडला यश मिळाले. ५० व्या मिनिटाला कर्णधार व्हर्जिल व्हॅन डाइकने रायन ग्रेव्हनबर्चच्या फ्री-किकवर एका शानदार हेडरने संघाला १-० अशी



आघाडी मिळवून दिली. मात्र जपानने जास्त वेळ वाट पाहिली नाही. ५७ व्या मिनिटाला ताकेफुसा कुबोने बॉक्समध्ये एक उत्तम चाल रचली आणि बॉल केटो नाकामुराकडे पास केला. नाकामुराने या संधीचा फायदा उचलला आणि बॉल जाळ्यात टाकून स्कोअर १-१ असा बरोबर केला. रायन ग्रावेनबर्चने ६४ व्या मिनिटाला आपला दुसरा असिस्ट नोंदवला.

## जर्मनीची धडाकेबाज सुरुवात! कुराकाओ ७-१ने पराभूत

■ ह्यूस्टन

**ह्यूस्टन** स्टेडियमवर चार वेळेचा विश्वविजेता जर्मनीने फिफा विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या कुराकाओला ७-१ अशा मोठ्या



फरकाने पराभूत करून आपल्या विजयी मोहिमेची शानदार सुरुवात केली. या विजयामुळे जर्मनीने केवळ ३ गुणच मिळवले नाहीत, तर विश्वचषक फुटबॉलच्या इतिहासातील ब्राझीलच्या नावावर असलेला एक विक्रमही मोडला. जर्मनी फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल करणारा संघ बनला आहे. विश्वचषकात जर्मनीचे २३९ गोल झाले, तर ब्राझील २३८ गोलांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

पहिल्या हाफमध्ये जर्मनीने जोरदार सुरुवात केली आणि फेलिक्स नमेचाने सहाव्या मिनिटाला शानदार गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र कुराकाओने २१व्या मिनिटाला बरोबरी साधत स्कोअर १-१ असा बरोबर केला. मग पुढे जर्मनीने सामन्यावर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. ३८व्या मिनिटाला निको श्लॉटरबेकने कॉर्नर किकवर एका शानदार हेडरने संघाला आघाडी मिळवून दिली. मध्यंतराच्या अगदी आधी हावर्ट्झने पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतर करून स्कोअर ३-१ असा केला. दुसऱ्या हाफच्या केवळ ६९ सेकंदांत जमाल मुसियालाने गोल करून विजय जवळपास निश्चित केला होता. मात्र त्यानंतरही नॅथॅनियल ब्राउन, डेनिझ उंडाव आणि काय हावर्ट्झ यांनी गोल करणे सुरूच ठेवले आणि जर्मनीने ७-१ अशा फरकाने सामना जिंकला.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
घनकचरा व्यवस्थापन
निविदाकरिता सूचना

**विषय:- विद्यार्थ्यांना शाळेपासून ते विज्ञान कुतुहल भवन आणि विज्ञान कुतुहल भवन पासून ते शाळेपर्यंत नेण्यासाठी भाडेतत्वावर बसेसचा पुरवठा.**

बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या परिवहन विभागाने, निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अनिवार्य पूर्व-पात्रता निकषांनुसार पात्र निविदाकारांकडून "विद्यार्थ्यांना शाळेपासून ते विज्ञान कुतुहल भवन आणि विज्ञान कुतुहल भवन पासून ते शाळेपर्यंत" वाहतुकीसाठी भाड्याने बस पुरवठा या कामासाठी ऑनलाईन निविदा आमंत्रित केल्या आहेत.

महानिविदा बोली क्र. :- २०२६_एमसीजीएम_१३०८५५१_१
निविदा प्रारंभ तारीख व वेळ :- १३.०६.२०२६ दुपारी १३:३० वा. नंतर
निविदा समाप्ती तारीख व वेळ :- १९.०६.२०२६ सायं.१६:०० वा. नंतर

महाराष्ट्र शासनाच्या ई-प्रोक्योरमेंट सिस्टम पोर्टल (महाटेंडर्स) (http://mahatenders.gov.in) वरून निविदा डाउनलोड केल्या जाऊ शकतात. तसेच निविदेची प्रत बीएमसीच्या पोर्टल http://portal.mcgm.gov.in वर 'ई-प्रोक्योरमेंट' विभागामधून डाउनलोड करता येईल.

कृपया नोंद घ्यावी की निविदा दस्तऐवज टपालाने पाठवले किंवा स्वीकारले जाणार नाही. यापुढे, या निविदेसंबंधीचे सर्व शुल्क, सूचना, अद्यतने, सुधारणा, शुद्धिपत्र, अधिक तपशील इत्यादी केवळ महाटेंडर पोर्टलवरच प्रसिद्ध केले जातील.

सही/-
पीआरओ/५८४/जाही./२०२६-२७ **कार्यकारी अभियंता वाहतूक, (शहर)**

खिडक्यांसाठी जाळ्यांचा आणि मच्छरदाण्यांचा वापर करा

महावितरण

**जाहीर सुचना**

डोंबिवली विभागातील वीज ग्राहकांना कळविण्यात येते की, **मंगळवार दि. १६.०६.२०२६ रोजी** खालील वीज वाहिनीचा वीज पूरवठा महत्वाच्या दुरूस्तीचे काम व देखभालीसाठी खाली दर्शविलेल्या वेळेत बंद राहील. तरी संबंधीत वीज ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे ही विनंती.

| उपकेंद्र | फिडर | दिनांक | वेळ | प्रभावित क्षेत्र | कामाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| २२ केव्ही बाजीप्रभू स्विचिंग स्टेशन | २२ केव्ही दता नगर फिडर | १६.०६.२०२६ | सकाळी १०.०० ते दुपारी १४.०० | स्वामी शाळा, कॉर्मस प्लाझा टिपटोप कॉर्नर, जुना आयरे रोड, फाटकवाडी, दत्तनगर, संगीतावाडी, दत्ता चौक, शिवमंदीर रोड, DNC कॉलेज, नांदीवली रोड | अतिमहत्वाचे दुरूस्ती काम करण्यासाठी |

कार्यकारी अभियंता, डोंबिवली (ना) विभाग म.रा.विज.वितरण कं.मर्यादित

मुंबई | मंगळवार
१६ जून, २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in



## कार्तिक रमला वेटलॉसच्या आठवणीत



**पॅरालिम्पिक** सुवर्णपदक विजेते मुरलीकांत पेटकर यांच्या जीवनावर आधारित 'चंदू चॅम्पियन' या चित्रपटाला प्रदर्शित होऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने अभिनेता कार्तिक आर्यनने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत या चित्रपटासाठी घेतलेले शारीरिक आणि मानसिक कष्ट, तसेच आपल्या अनुभवांना उजाळा दिला आहे.

कार्तिक लिहितो की, या भूमिकेसाठी मी १८ किलो वजन घटवले; पण त्या बदल्यात मला मिळालेला अनुभव आणि शिकवण खूप मोठी आहे. मुरलीकांत पेटकर यांची भूमिका जगण्यासाठी मला प्रचंड घाम गाळावा लागला, पहाटे लवकर उठून मेहनत करावी लागली. त्याच्या या थक्क करणाऱ्या शारीरिक बदलाची (ट्रान्सफॉर्मेशन्स) प्रचंड चर्चा झाली होती. कार्तिक हा एगेटेरियन आहे. या भूमिकेसाठी त्याला अनेकांनी मांसाहार सुरू करण्याचा सल्ला दिला होता, पण त्याने केवळ प्रशिक्षकांचा सल्ला मानला आणि आहार व व्यायामाची शिस्त पाळून वजन कमी केले.

## रुक्मिणी झळकणार नानीच्या चित्रपटात



**दाक्षिणात्य** चित्रपटसृष्टीत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणारी कन्नड अभिनेत्री रुक्मिणी वसंत हिच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. टॉलिवूडचा 'नॅचरल स्टार' म्हणून ओळखला जाणारा प्रसिद्ध अभिनेता नानी याच्या आगामी चित्रपटात रुक्मिणीची मुख्य भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे. नानी हा केवळ एक उत्तम अभिनेता नसून तो एक यशस्वी निर्माता देखील आहे. त्याच्या वॉल पोस्टर सिनेमा या स्वतःच्या निर्मिती संस्थेअंतर्गत त्याने आतापर्यंत 'हिट', 'हिट २' यांसारख्या अनेक दर्जेदार आणि हटके चित्रपटांची निर्मिती केली आहे. याच बॅनरखाली सुरू होत असलेल्या नव्या चित्रपटासाठी त्यांनी रुक्मिणी वंसत हिला मुख्य अभिनेत्री म्हणून करारबद्ध केले आहे.

हा आगामी चित्रपट महिला प्रधान प्रकल्प असण्याची शक्यता आहे. याच कारणामुळे निर्मात्यांनी सर्वप्रथम मुख्य अभिनेत्रीची निवड केली असून, आता तिच्या जोडीला योग्य अशा युवा अभिनेत्याचा शोध सुरू केला आहे.

## मंजिरी फडणीसचा श्वान न्यायासाठी लढा



'जाने तू... या जाने ना', 'ग्रँड मस्ती' आणि 'किस किसको प्यार करू' यांसारख्या चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीस आलेली प्रसिद्ध अभिनेत्री मंजिरी फडणीस हिने तिच्या गृहनिर्माण सोसायटीमधील एका 'कम्युनिटी डॉग'च्या (सोसायटीतील पाळीव श्वान) कथित हत्येप्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मायकी नावाच्या या निष्पाप श्वानाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण शेवटपर्यंत लढणार असल्याचा निर्धार तिने केला आहे. या धक्कादायक घटनेबाबत मंजिरीने सोशल मीडियावर एक अत्यंत भावुक व्हिडिओ शेअर करून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यानुसार, मायकी हा श्वान २०१९ पासून त्यांच्या सोसायटीत राहत होता. त्याच्या मूळ मालकांनी त्याला सोडून दिल्यानंतर सोसायटीतील अनेक कुटुंबे त्याचा सांभाळ करत होते आणि तो सर्वांचा लाडका बनला होता.

मायकी सोसायटीच्या तळघरात (बेसमेंट) विश्रांती घेत असताना काही रहिवाशांनी त्याच्यावर काठीने किंवा लोखंडी गदा-रॉडने जीवघेणा हल्ला केला. या अत्यंत क्रूर हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मंजिरीने इन्स्टाग्रामवर आणखी एक भावनिक पोस्ट शेअर करत लिहिले की, या घटनेनंतर आमच्या सोसायटीतील कोणालाही नीट झोप लागलेली नाही. ज्यांनी मायकीची क्रूर हत्या केली, त्यांच्याविरोधात ठोस पुरावे गोळा करण्यासाठी सर्वजण अहोरात्र प्रयत्न करत आहेत. पोलिसांना त्यांच्या तपासात सर्वतोपरी मदत केली जात आहे. दोषींना त्यांच्या कृत्याची योग्य ती शिक्षा मिळेपर्यंत आणि त्यांना कायद्याच्या पिंजऱ्यात उभे करेपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. सोशल मीडियावर अनेकांनी तिच्या या निर्धाराला पाठिंबा दिला आहे.

## महाराष्ट्रीयन चेहरेपट्टी फायद्याची : गिरीजा



**मराठी** आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी प्रसिद्ध अभिनेत्री गिरिजा ओक सध्या 'भारत भाग्य विधाता' या नव्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने बॉलीवूडमधील 'कास्टिंग' (कलाकारांची निवड) प्रक्रियेवर आणि कलाकारांच्या प्रांतीय चेहरेपट्टीवर (एथ्निसिटी) भाष्य केले आहे. चित्रपटसृष्टीत कलाकाराच्या दिसण्यावरून आणि त्याच्या प्रांतीय पार्श्वभूमीवरून भूमिका ठरवणे हा एक दृष्टिकोनाचा विचित्र खेळ (स्ट्रेंज गेम ऑफ परसेप्शन) असल्याचे तिने म्हटले आहे.

एका मुलाखतीत गिरिजा ओक म्हणाली, गेल्या काही वर्षांत मी मराठीत फारसे काम केलेले नाही आणि माझ्याकडे हिंदीतील प्रकल्प जास्त आले आहेत. मला नेहमीच वैविध्यपूर्ण भूमिकांची ऑफर मिळाली. कदाचित मी काहींना महाराष्ट्रीयन दिसत नाही, तर काहींना मी तशी दिसते. चित्रपटसृष्टीत कधीकधी तुमची प्रांतीय चेहरेपट्टी तुमच्या फायद्याची ठरते, तर कधी ती तुमच्या विरोधातही जाऊ शकते. हा सगळा लोकांच्या मानसिकतेचा आणि दृष्टिकोनाचा खेळ आहे. गतवर्षीच्या 'परफेक्ट फॅमिली' या मालिकेत प्रसिद्ध कास्टिंग मुकेश छाब्रा यांनी गिरिजाला एका पंजाबी कुटुंबातील सुनेची (नीती कारकारिया) भूमिका दिली होती. गिरिजा म्हणाली की, ही भूमिका चित्रपटसृष्टीतील रूढीवादी चौकटीला छेद देणारी ठरली. काही लोक मला मराठी भाषेवरील प्रभुत्वामुळे व हिंदी उत्तम बोलता येत असल्यामुळे महाराष्ट्रीयन पात्रांसाठी निवडतात. या गोष्टी माझ्यासाठी आतापर्यंत फायद्याच्याच ठरल्या आहेत, असे तिने स्पष्ट केले.

## वेदांग रैनाचा प्रेमभंगाबाबत खुलासा



**'द आर्चीज'** या चित्रपटानंतर आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणारा तरुण अभिनेता वेदांग रैना सध्या त्याच्या 'मै वापस आऊंगा' या नव्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात तो दिलजीत दोसांझ, नसीरुद्दीन शाह आणि शर्वरी वाघ यांच्यासोबत मुख्य भूमिकेत दिसत आहे. फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट मोडलेली स्वप्ने आणि विखुरलेल्या हृदयांची भावनिक कथा मांडतो. या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेल्या एका विशेष मुलाखतीत, वेदांगने त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील काही भावनिक पैलूंवर आणि 'हार्टब्रेक' या विषयावर उघडपणे भाष्य केले आहे. आयुष्यात कधी प्रेमभंगाचा सामना करावा लागला आहे का? या प्रश्नाचे उत्तर देताना वेदांग म्हणाला, हो, मी अशा परिस्थितीचा सामना केला आहे. मला वाटते की, प्रत्येक व्यक्ती आयुष्यात कधी ना कधी या टप्प्यातून जाते आणि हार्टब्रेक म्हणजे केवळ प्रेमात मिळालेला नकार किंवा अपयश असं नाही, ते कोणत्याही प्रकारचे असू शकते. मी माझ्या आयुष्यात अनेकदा प्रेमभंगाच्या वेदना अनुभवल्या आहेत.

या वेदनांमधून बाहेर कसे पडायचे, यावर तो म्हणाला, काळ हा सर्व जखमांवर उत्तम मलम आहे, हे जरी ऐकायला जुने वाटत असले तरी ते अगदी खरे आहे. काळासोबत तुम्हाला परिस्थितीशी जुळवून घेता येते. अशा काळात तुम्ही स्वतःवर अधिक प्रेम करायला शिकता. माझा असा विश्वास आहे की, तुम्ही स्वतःवर जितके जास्त प्रेम कराल, तितका अशा दुःखाचा तुमच्यावर कमी परिणाम होतो.

## छ.संभाजीनगरमध्ये शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी काँग्रेसचा रास्तारोको

■ छत्रपती संभाजीनगर

**शेतकऱ्यांच्या** विविध मागण्यांसाठी काँग्रेसने खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली आज छत्रपती संभाजीनगरमध्ये रास्तारोको आंदोलन केले. आंदोलना शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी लागू करावी, तसेच खत विक्रीसाठी सुरू करण्यात आलेले ऑनलाईन ॲप तात्काळ बंद करावे, अशी मागणी केली. गेल्या काही दिवसांपासून खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, तांत्रिक अडचणींमुळे त्यांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा आरोपही करण्यात आला.

काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मुख्य रस्त्यावर ठिय्या मांडत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सुमारे अर्धा तासाहून अधिक काळ महामार्ग रोखून धरल्याने जालना रोडवर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. ठिय्या आंदोलन करणाऱ्या काळे यांच्यासह काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांना उचलून नेल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. ताब्यात घेतल्यानंतर काळे यांनी सरकारला इशारा देत सांगितले की, हे आंदोलन केवळ सुरुवात असून मागण्या मान्य न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन केले जाईल.

## पर्यावरणवाद्यांमध्ये संताप भाईंदरमधील झाडे कापणार

■ भाईंदर

**मिरा**-भाईंदर शहरातील विविध विकासकामांसाठी २२ झाडे तोडली जाणार असल्याने पर्यावरणवाद्यांमध्ये संताप पसरला. या शहरात विविध ठिकाणी खाजगी, सरकारी विकासकामे सुरू आहेत.

यात प्रामुख्याने इमारतींचे बांधकाम, रस्ते रुंदीकरण अशा विविध विकासकामांचा समावेश आहे. तर या विकासकांच्या आड येणारी एकूण २२ झाडे मुळासकट काढण्यात येणार आहेत. त्याची नोटीस पालिकेने प्रसिद्ध केली आहे. त्यात ४ ते २८ वर्ष जुन्या असलेल्या बदाम, जांभूळ, पिंपळ, अशोक, सुबाभूळ, कांचन आणि भेंडी अशा विविध झाडांचा समावेश आहे. या २२ झाडांपैकी केवळ मेरीगोल्ड रोड, बेवर्ली पार्क येथील इमारतींसमोर असणाऱ्या ४ वर्ष जुन्या कांचनच्या झाडाचे पुनर्रोपण केले जाणार आहे.

## भाजपा गटनेते अशोक शेळकेंची फेरीवाल्यास मारहाण

■ नालासोपारा

**वसई-विरार** महापालिकेतील भाजपाचे गटनेते अशोक शेळके यांनी फेरीवाल्यास मारहाण केल्याची घटना रविवारी रात्री नालासोपारा पूर्व येथे घडली.

नालासोपारा पूर्वेतील फायर ब्रिगेड कार्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या डीमार्टजवळील खाऊ गल्ली परिसरात अनधिकृत फेरीवाले व्यवसाय करतात. या फेरीवाल्यांमुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असून पादचाऱ्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार करण्यात येत होत्या.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत अशोक शेळके रविवारी रात्री संबंधित ठिकाणी पोहोचले. तेथे त्यांनी फेरीवाल्यांना अनधिकृत व्यवसायाबाबत जाब विचारला. यावेळी एका फेरीवाल्यासोबत त्यांचा वाद झाल्याचे सांगितले जात आहे. वाद वाढल्यानंतर संतापलेल्या शेळके यांनी संबंधित फेरीवाल्यास मारहाण केल्याचा आरोप होत आहे. काही दिवसांपासून या परिसरात अनधिकृत फेरीवाले तसेच खाद्यपदार्थांच्या विक्रेत्यांनी उच्छाद मांडला आहे. त्यांच्याकडे गॅस सिलिंडर असून उघड्यावर ते पदार्थ शिजवत असतात. तेथे रुग्णवाहिका जाण्यासाठी देखील जागा नाही. याबाबत आम्ही जाब विचारायला गेलो होतो असे शेळके यांनी सांगितले. एका विक्रेत्याने आमच्या एका कार्यकर्त्यावर हात उचलला त्यामुळे त्या क्रियेची ती प्रतिक्रिया होती असे शेळके यांनी सांगितले.

## तांदूळवाडी पिकअप अपघातातील ८ जणांवर सामुदायिक अंत्यसंस्कार

■ पंढरपूर

**सोलापूर** जिल्ह्यातील तांदूळवाडी येथे पिकअप विहिरीत कोसळल्याच्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ८ भाविकांवर मध्यरात्रीनंतर पंढरपूर येथील गोपाळपूर रोडवरील वैकुंठ स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात सामुदायिक अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्घटनेत ३ माय-लेकरांसह आजीचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करत आहे.

या दुर्घटनेत पूजा साकोरे (२३) आणि तिचा मुलगा आरव साकोरे (८), पूजा बावचे (२७) आणि तिचा सहा महिन्यांचा मुलगा समर्थ बावचे, अश्विनी बावचे (२७) व तिची जुळी मुले संस्कार आणि संस्कृती बावचे (१४), तसेच इंदुबाई दशरथ बावचे (६०) यांचा मृत्यू झाला. तीन माय-लेकरांसह आजीचा एकाच अपघातात मृत्यू झाल्याने बावचे आणि साकोरे कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. म्हसवड येथील सिद्धनाथ देवस्थानाचे दर्शन घेऊन परतत असताना तांदूळवाडी गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर पिकअप गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल विहिरीत कोसळली.

## तामिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या घटस्फोटावर ७ ऑगस्टला सुनावणी होणार

■ चेन्नई



**अभिनयाच्या** क्षेत्रातून राजकारणाकडे वळलेले व पहिल्याच प्रयत्नात तामिळनाडूचे मुख्यमंत्री बनलेले जोसेफ विजय यांच्या पत्नी संगिता सोरनालिंगम यांनी दाखल केलेल्या घटस्फोटाच्या याचिकेवरील सुनावणी आज चेंगलपट्टू महिला न्यायालयाने ७ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली.

आज झालेल्या सुनावणीसाठी विजय आणि संगिता दोघेही व्यक्तिशः न्यायालयात हजर होते. सकाळी साडेदहा वाजता सुनावणी सुरू झाली. मात्र दोघेही हजर असुनही एखादा मोठा निर्णय किंवा दोन्ही बाजुंनी एखादा ठराव, असे काहीही झाले नाही.

विजय आणि संगिता यांच्या लग्नाला २७ वर्षे झाली आहेत. उभयतांमध्ये काही कारणांवरून मतभेद झाले. त्यानंतर संगिता यांनी घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या विवाहाची नोंदणी १९९८ मध्ये ब्रिटनमध्ये झाली होती. त्यानंतर १९९९ मध्ये चेन्नईत या जोडप्याने पारंपरिक पद्धतीने विवाह केला होता.

विजय यांचे अन्य महिलेशी संबंध असल्याचा आरोप संगिता यांनी केला आहे. मात्र त्यांनी कोणाचेही नाव घेतलेले नसले तरी विजय यांचे नाव त्यांची सहकलाकार तृष्णा कृष्णन हिच्याशी जोडले जात आहे.

## बदलापूर शहरातील 'सिग्नल' आता मराठी भाषेत दिसणार!

■ बदलापूर

**कुळगाव** बदलापूर नगरपरिषदेने शहरातील ट्रॅफिक सिग्नलवरील दिशादर्शक व सूचना मराठी भाषेत लिहिल्या आहेत. या निर्णयामुळे शहरवासीयांकडून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उचलण्यात आलेल्या सकारात्मक पावलेचे मोठे स्वागत होत आहे.

आता सिग्नलवर 'थांबा' आणि 'जा ' हे शब्द तसेच मराठी अंक पाहायला मिळणार आहेत.यापूर्वी सिग्नल यंत्रणेत 'स्टॉप' आणि 'गो' असे इंग्रजी शब्द होते.ते आता मराठीत असणार आहे.

बदलापूर पूर्वेकडील घोरपडे चौक परिसरात नगराध्यक्ष रुचिता घोरपडे यांच्या हस्ते या उपक्रमाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले.यावेळी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष विकास गुप्ते, तालुकाध्यक्ष सुदाम कराळे,शहराध्यक्ष मांडवीकर, माजी शहराध्यक्ष जयेश कदम तसेच माजी उपनगराध्यक्ष प्रकाश पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## आयात शुल्क हटविल्याने कापूस दरात मोठी घसरण



■ जळगाव

**केंद्र** सरकारने कापसावरील ११ टक्के आयात शुल्क हटविण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मात्र,या निर्णयाचा थेट विपरित परिणाम आता देशांतर्गत बाजारपेठेवर दिसत असून गेल्या काही दिवसांत कापसाच्या दरात प्रतिक्विंटल सुमारे ५०० रुपयांची मोठी घसरण झाली आहे.

काही आठवड्यांपूर्वी कापसाला ८ हजार २०० ते ८ हजार ९०० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळत होता. मात्र, आयात शुल्क हटविण्याच्या निर्णयानंतर दर घसरून ७ हजार ९०० ते ८ हजार ४०० रुपयांपर्यंत आले आहेत. सध्या बहुतांश शेतकऱ्यांनी आपला कापूस विकून टाकला असल्याने त्यांच्या हातात मोठा साठा शिल्लक नाही. त्यामुळे दरघसरणीचा तातडीचा आर्थिक फटका अनेक शेतकऱ्यांना बसलेला नसला, तरी नव्या हंगामात याचा परिणाम जाणवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, आयात शुल्क हटविल्यामुळे परदेशातून स्वस्त कापूस भारतीय बाजारात येण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे आगामी हंगामात देशांतर्गत कापसाच्या दरांवर दबाव राहू शकतो. याचा थेट परिणाम कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## २८ जूनला 'टीईटी'! राज्यातील २.२६ लाख शिक्षक परीक्षा देणार

■ सोलापूर

**सर्वोच्च** न्यायालयाच्या आदेशानुसार सेवानिवृत्तीला पाच वर्षे कमी असलेले वगळून सर्व शिक्षकांना ऑगस्ट २०२८ पर्यंत टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. ही परीक्षा येत्या २८ जूनला होणार असून या 'टीईटी' साठी राज्यातील दोन लाख २६ हजार ४६३ शिक्षकांनी अर्ज केल्याची माहिती समोर आली आहे.

**उत्तीर्ण होण्यासाठी ६० टक्के गुणांची अट**

'टीईटी'च्या पेपर एक व पेपर दोनसाठी नोकरीतील शिक्षकांचे एकूण तीन लाख ४६ हजार अर्ज आहेत. इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गांवरील शिक्षकांना 'टीईटी'चा पेपर-एक, तर सहावी ते आठवीच्या वर्गांवरील शिक्षकांना पेपर-दोन द्यावा लागतो. काही शिक्षक तिसरी-चौथीपासून सहावी-सातवीच्या वर्गांवर नियुक्त आहेत. त्यामुळे अशा शिक्षकांना दोन्ही पेपर उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. त्यामुळे त्यांनी दोन्ही पेपरसाठी अर्ज केले आहेत.

## 'मी सावित्रीबाई..' पुन्हा येणार अभिनेते अमोल कोल्हेंची माहिती




■ मुंबई

**'मी** सावित्रीबाई ज्योतिराव फुले' ही मालिका १४ जून रोजी थांबली असली, तरी तिची गोष्ट इथेच संपणार नसल्याचे अभिनेते आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी स्पष्ट केले आहे. मालिकेच्या अचानक समाप्तीनंतर राज्यभरातून उमटलेल्या प्रतिक्रिया लक्षात घेता, ही मालिका नव्या स्वरूपात पुन्हा सुरू होणार असल्याचे संकेत त्यांनी दिले.

मालिकेचा शेवटचा भाग प्रसारित झाल्यानंतर कोल्हे यांनी यूट्यूबवरून प्रेक्षकांशी संवाद साधला. 'स्टार प्रवाह'वरील प्रसारण थांबले असले, तरी सावित्रीबाई आणि महात्मा फुले यांच्या विचारांची मांडणी पुढेही सुरू राहील, असे त्यांनी सांगितले. अवघ्या १५२ भागांनंतर मालिका बंद झाल्याने प्रेक्षकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्यभरातून हजारो फोन, संदेश आणि ई-मेलद्वारे मालिका सुरू ठेवण्याची मागणी करण्यात आली. पंढरपूर आणि इंदापूरसारख्या ठिकाणी स्थानिक स्तरावर पाठिंबा आणि आंदोलनही झाले. मालिका बंद करण्यामागे टीआरपी आणि उत्पन्नाचे गणित जुळत नसल्याचे कारण पुढे आले. मात्र, या मालिकेची सामाजिक आणि शैक्षणिक किंमतही महत्त्वाची असल्याचे कोल्हे यांनी नमूद केले. तरीही त्यांनी वाहिनीचे आभार मानले. दरम्यान, रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आणि छगन भुजबळ यांसारख्या नेत्यांनीही मालिकेला पाठिंबा दर्शवला आहे.

## नवाकाळ शब्दकोडे १६३८



**आडवे शब्द –**

१. विचित्र, चमत्कारिक ४. इसम, व्यक्ती ६. बाणासारखे टोक असलेले मोठे शस्त्र ८. पाऊल; हुद्दा ९. चिडखोर ११. नकली १२. मृत्युदंड १४. रीत १५. पलायन १६. आळंदीचा पवित्र वृक्ष १७. शिवरात्रीचे आंबटगोड फळ १९. शाहिराचे चर्मवाद्य २१. काजू, बदाम, पिस्ते वगैरे पदार्थ २४. पृथ्वी २५. लाकूड २६. दक्षिणेचे निसर्गरम्य राज्य २८. घडलेली गोष्ट, प्रसंग ३०. पाण्यातील भयानक प्राणी ३२. एक ज्वालाग्राही पदार्थ, लाख ३३. मदतीसाठी देवाचा केलेला धावा ३६. साळुंकी ३७. रावणाचे एक नाव ३९. स्मरण, स्मृती ४०. खेकडा; बारा राशीतील एक ४१. चिखल, राडा ४३. गायब, दिसेनासा ४६. चीर, भेग ४७. प्रश्नोत्तरे ५१. आंदोलन ५४. चातुर्य, शहाणपण ५६. लाडिक ५७. पक्षी, विहग ५८. विक्रीचा भाव ६०. फुलातील पराग ६२. ताकीद ६३. अशा वस्तूतून प्रकाश आरपार जाऊ शकत नाही. ६५. सोपे दिसणारे योगासन ६८. गीत, पद ७०. भोवती कडी असलेला ग्रह ७१. डोंगरउताराची जमीन ७२. मणक्याचे खालचे हाड ७४. घशाला सुटलेली खाज ७६. लहान घागर ७७. प्रसंग, समय ७८. ऐट, रुबाब,, दिमाख ७९. परमेश्वर ८२. विशेष ८३. मुख ८४. अचंबा ८५. धोकादायक ८८. सह्याद्री ९०. निभाव ९२. उठाव, क्रांती ९३. नर्तन, नृत्य ९४. शंकराचे स्तोत्र ९६. पेढ्यांचा लोकप्रिय प्रकार ९७. योग्य, उचित ९८. ययाती राजाची कन्या ९९. किल्ल्याभोवतीची संरक्षक भिंत १००. लक्ष्यवेध १०१. वेगवान १०२. लहान कट्यार १०३. शुक्राचार्यांची विशेष विद्या १०४. पार्वती १०५. अनुराग, प्रीती

**उभे शब्द –**

१. करंगळीशेजारचे बोट २. सातू ३. केसाची लट ४. आयुध, साधन ५. एखादे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी ७. गव्हाची खीर ८. स्वीकार, अंगीकार ९. कब्जा, अंमल १०. पलीकडे १३. वकिलाचे अशील १५. वाळवलेले आले १८. फेरा, लांबचा रस्ता २०. सरशी २१. अमृत; मुलींचे एक नाव २२. रावणाचा मुलगा २३. रस्ता २६. वधूवरांना लग्नाआधी दिलेले स्नेहभोजन २७. कुशाग्र बुद्धी २९. आवाज; छंद ३१. बोभाटा ३२. खरखरीत ३४. स्त्रियांच्या दंडावरचा दागिना, बाजूबंद ३५. वक्र ३६. अर्धा कोस अंतर ३८. युक्ती ३९. पाणी ४१. समुद्र, सागर ४२. लसणाची पाकळी ४४. पावटयाहून मोठे व रंगीत दाणे असलेली भाजी ४५. परिचय ४६. मुक्काम ४८. शेत, मळा ४९. एक रक्तशोषक कीटक ५०. फाजील, अमर्याद ५२. महिषी, म्हैस ५३. भेद, अंतर ५५. बोलावल्यावर लगेच (मदतीला येणे) ५८. प्रेक्षणीय ५९. अधीन, कह्यात, अंकित ६१. स्मरणी ६२. पायपीट, चालून दमणूक ६४. दहा ६६. तुफान, वावटळ ६७. पैशांची अडचण, तंगी ६८. बाजू, पक्ष ६९. नटवा, दिखाऊ ७३. बांबूची उभट टोपली ७५. अंकित, अधीन ७६. कनवट ७७. गावाची सीमा ७९. हनुमानाचे वडील ८०. लांब अंतरावर ८१. घासूनपुसून स्वच्छ ८२. चहाबरोबर बेकरीतला खुसखुशीत पदार्थ ८३. मसालेभातातली एक फळभाजी, तुंडिकेरी ८५. उभा ८६. दारुडा, मद्यपी ८७. विविध ८९. गोवर्धन उचलणारा श्रीकृष्ण ९०. बटर घातलेली मिश्रभाजी व पाव ९१. देवांना अमर करणारे पेय ९२. मनाई ९५. कोणाचीही बाजू न घेणारा ९६. वीज येण्यापूर्वी घरोघरी असलेले रॉकेलवरचे दिवे ९८. भूतपूर्व १००. पुढारी १०१. झाड, वृक्ष •

### नवाकाळ कोडे क्रमांक १६३७ चे उत्तर

**आडवे शब्द** : १. सुंभ ३. अलका ५. बहुविध ७. कस ९. दक्ष ११. कदरदान १२. स्तब्धता १३. जिवलग १५. परत १६. वाटिका १७. वरमाई १९. रजक २१. पाणी २२. रमणी २४. नश्वर २६. ताजवा २७. संध्याकाळ ३१. रवसड ३३. नग ३५. जनक ३६. सुबक ३७. सिंदबाद ३९. खापर ४०. डामडौल ४२. देह ४३. रत्तल ४५. मती ४७. दल ४८. घाव ४९. काबू ५१. अवगत ५४. व्रतस्थ ५६. नेकी ५७. भडिमार ५९. कावा ६०. धडगत ६३. तग ६४. उशीर ६६. राजीखुशीने ६९. मूर्ख ७०. चलती ७२. गतिमान ७४. भडास ७६. गहिवर ७९. व्रज ८१. काठ ८३. कळक ८५. मग ८७. माहेर ८९. मांजरपाट ९०. राघू ९१. मटार उसळ ९३. मंदिर ९४. थेंब ९५. मात ९६. अंबर ९८. सामोरा १००. तागा १०२. पीयूष १०४. मुद्दाम १०५. जवळीक १०७. क्षमता १०९. डंख ११०. लज्जत १११. चक्की ११२. ठकवणे

**उभे शब्द** : १. सुंदर ते ध्यान २. भरत ३. अनवाणी ४. कास्तकार ५. बतावणी ६. विद्यमान ७. कवडी ८. सल १०. क्षणिक ११. कप १४. गरज १८. ईश्वरदत्त २०. जवान २१. पाळ २३. मट्ठ २५. रव २६. ताडपत्री २७. संजय २८. काकडा २९. प्रबल ३०. मेद ३२. सखा ३४. गमतीदार ३६. सुडौल ३७. सिंह ३८. बारव ४१. मदत ४२. देवव्रत ४४. लकाकी ४६. शिवकाशी ५०. तडित ५२. गवार ५३. सड ५५. स्थळ ५६. नेताजी ५८. मागमूस ६०. धवल ६१. गर्क ६२. काशी ६४. उबग ६५. प्रतिकार ६६. रान ६७. खुजा ६८. नेभळट ७०. चर ६१. तीव्र ७३. माठ ७५. डाक ७७. हिमटा ७८. वगर ८०. जमा ८२. झांजर ८३. कपाळमोक्ष ८४. लघू ८६. हसतमुख ८८. हेरंब ८९. मांदियाळी ९०. राबता ९१. मद्यपी ९२. उमा ९६. अंमल ९७. रजत ९९. रामठ १०१. गाऱ्हाणे १०३. यूप १०६. कच १०८. ताक

# अमेरिका-इराणमध्ये अखेर शांतता करार

पान १ वरून

इराणने त्वरित अधिकृतरित्या दुजोरा दिला नसल्याने काहीशी चिंता आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या इस्त्रायलमुळे अमेरिकेने इराणविरुद्ध युद्धात उडी घेतली त्या इस्त्रायलला अमेरिकेने युद्धबंदीच्या वाटाघाटींपासून दूर ठेवले. त्यामुळे इस्त्रायलचे युद्धखोर पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू नाराज असल्याची चर्चा आहे.

तीन महिन्यांपूर्वी २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरुद्ध युद्ध पुकारले. पहिल्याच दिवशी अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला अली खोमेनी मारले गेले. युद्धामुळे जगाची कच्च्या तेलाची पुरवठा साखळी विस्कळीत झाली. परिणामी कच्च्या तेलाचा भडका उडून जगभरात महागाईचा आगडोंब उसळला. जगाच्या कच्च्या तेलाच्या एकूण पुरवठ्यापैकी वीस टक्के पुरवठा होर्मुजमार्गे होतो. युद्ध सुरू होताच इराणने होर्मुज बंद करून जगाची नाकाबंदी केली. त्यामुळे कच्च्या तेलाचे दर प्रति पिंप शंभर डॉलरच्या पलिकडे गेले. भारत इंधन तेलासाठी ८० ते ८५ टक्के आयातीवर अवलंबून असल्यामुळे भारतालाही या युद्धाचे चटके सहन करावे लागले. पेट्रोल-डिझेलची टंचाई निर्माण झाली. स्वयंपाकाचा गॅस महागला. त्यामुळे महागाई वाढली.

काही दिवसांतच या युद्धाची व्याप्ती लेबनॉनपर्यंत पोहोचली.खोमेनी यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी २ मार्चपासून लेबनॉनमधील इराण समर्थित बंडखोरांचा गट हिजबुल्लाने युद्धात उडी घेतली. पुढील काही दिवस इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांनी परस्परांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले. नेतन्याहू यांच्या आदेशावरून इस्त्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनवर तुफानी हल्ले केले. त्यामुळे सुमारे दहा लाख लोकांना विस्थापित व्हावे लागले. ट्रम्प यांनी वारंवार इशारे देऊनही इस्त्रायलने लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवले. त्यामुळे प्रत्युत्तरादाखल इराणने आखाती देशांमधील अमेरिकेच्या तळांना लक्ष्य केले.

मात्र ट्रम्प यांनी सुमारे दीड महिन्यानंतर युद्ध समाप्तीसाठी प्रयत्न सुरू केले. त्यासाठी अमेरिकेने तात्पुरती युद्धबंदी लागू केली. त्यानंतर युद्धबंदीचा कालावधीही वाढवला. इराणने देखील पाकिस्तानच्या मध्यस्थीने अमेरिकेशी शांतता चर्चा करण्याची तयारी दर्शवली. पाकिस्तानने इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराणमध्ये चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पहिल्या बैठकीत चर्चा निष्फळ ठरली. तर दुसऱ्या बैठकीला इराणकडून एकही प्रतिनिधी न आल्याने चर्चा होऊच शकली नाही. या दरम्यान इस्त्रायल या शांततेच्या प्रयत्नांमध्ये खोडा घालत राहिला होता. इस्त्रायल सतत लेबनॉनवर हल्ला चढवीत राहिला. त्यामुळे ट्रम्प यांनी शांततेच्या चर्चेपासून नेतन्याहू यांना दूर ठेवले. नेतन्याहू यांचा आक्षेप असला तरी अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करार होणारच, असे ट्रम्प यांनी ठासून सांगितले. याप्रसंगी त्यांनी नेतन्याहू यांच्यावर जोरदार टीका केली. नेतन्याहू आडमुठ्या स्वभावाचे आहेत. त्यांना वास्तवाची जाणीव नाही. लेबनॉनवर हल्ले सुरूच ठेवणे हा नेतन्याहू यांचा मुर्खपणा आहे, असे ट्रम्प म्हणाले.

### ट्रम्प ८० वर्षांचे झाले

संपूर्ण जगाला चिंतामुक्त करणारी अमेरिका-इराण युद्धबंदीची घोषणा झाली त्या दिवशी म्हणजे काल रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वयाच्या ८० व्या वर्षात पदार्पण केले.त्याबरोबर ट्रम्प यांनी आपल्या नावे आणखी एक विक्रम नोंदवला.ट्रम्प हे अमेरिकेचे सर्वात जास्त वयाचे राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. ८० व्या वर्षातही ट्रम्प यांचा उत्साह तरुणांना लाजवेल असा आहे.

### करारातील महत्त्वाचे मुद्दे

शांतता करारातील तीन मुद्दे अत्यंत महत्वाचे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे युद्धामुळे मालमत्तेची झालेली हानी भरुन काढण्यासाठी अमेरिकेने इराणला ३०० अब्ज डॉलर देण्याची तयारी दर्शवली आहे. दुसरा मुद्दा म्हणजे इराणची गोठवलेली १२ अब्ज डॉलरची रक्कम अमेरिका मुक्त करणार आहे. तिसरा मुद्दा म्हणजे आपल्या अणु कार्यक्रमाबाबत निर्णय घेण्यासाठी इराणला अमेरिकेने ६० दिवसांची मुदत दिली आहे. होर्मुजवर वाहतूक टोल वसुलीबाबत इराणची भूमिका स्पष्ट झालेली नाही. इराण आपला अणु कार्यक्रम सोडून देण्यास तयार आहे का, हेही स्पष्ट झालेले नाही.

# उपग्रह चित्रांत मान्सूनबाबत धक्कादायक वास्तव उघड

पान १ वरून

भागांमध्ये पावसाची क्रिया जवळपास ठप्प झाल्याचे चित्र आहे. अलीकडील काही दिवसांत पावसाने कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि मध्य भारतातील काही भागांमध्ये प्रगती केली असली तरी पावसाचा वेग अपेक्षेप्रमाणे वाढलेला नाही. हवामान तज्ज्ञांच्या मते, यामागे समुद्रातील आर्द्रतेचा अभाव नसून वातावरणाच्या वरच्या स्तरांमध्ये सुरू असलेला वाऱ्यांचा संघर्ष कारणीभूत आहे. या परिस्थितीच्या केंद्रस्थानी असलेली 'वेस्टरली जेट स्ट्रीम' म्हणजे पश्चिमेकडून वाहणारे अतिवेगवान वारे यंदा नेहमीपेक्षा अधिक दक्षिणेकडे सरकले आहेत. त्यामुळे पोषक असलेल्या 'ईस्टरली जेट स्ट्रीम'च्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला आहे. परिणामी, उष्ण आणि दमट हवा वरच्या दिशेने जाण्याची प्रक्रिया मंदावली असून ढगनिर्मिती व पावसासाठी आवश्यक वातावरण तयार होत नाही. हवामान तज्ज्ञांनी या स्थितीला मान्सून पॉज असे संबोधले आहे. देशातील मोठ्या भागात अपेक्षित स्वरूपाचा पाऊस पडत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, आठवड्याच्या उत्तरार्धात जेट स्ट्रीमची तीव्रता कमी झाल्यानंतर मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तोपर्यंत देशातील अनेक भागांना जोरदार आणि व्यापक पावसासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# आता लालबाग-बोरिवलीतही पांढरा पट्टा

पान १ वरून - आवारात पांढरे पट्टे मारल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. या सोसायटीत मराठी आणि गुजराती दोन्ही समाजातील नागरिक वास्तव्यास आहेत. परिसरात जैन मंदिर आहे. बोरिवली पश्चिमेतील चिकूवाडी परिसरात विट्टी इंटरनॅशनल स्कूलजवळील एका सोसायटीबाहेरील संपूर्ण फुटपाथच पांढऱ्या रंगाने रंगवला आहे. त्यामुळे हा वाद आता मुंबईच्या उपनगरांमध्ये पसरत आहे. सार्वजनिक जागांवर अशा प्रकारचे रंगकाम करण्यासाठी परवानगी घेतली होती का, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पण पालिकेने मौन राखले आहे.

# जी-७ शिखर परिषद सुरू

पान १ वरून

गोलार्धातील देशांचाही समावेश होतो. जी-७ शिखर परिषदेत भारत आतापर्यंत १३ वेळा सहभागी झाला आहे. जी-७ शिखर परिषदेत भारताचा सातत्यपूर्ण सहभाग जागतिक शांतता, सुरक्षा, विकास आणि पर्यावरणीय स्थिरता यांच्याशी संबंधित समस्या सोडवण्यातील भारताची भूमिका आणि योगदान याला वाढती आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे याचे लक्षण मानले जाते. शिखर परिषदेच्या आऊटरीच सत्रात पंतप्रधान मोदी अन्य आमंत्रित देशांच्या प्रमुखांशी स्वतंत्रपणे चर्चा करणार आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार्य, विकासात्मक एकजूट, परस्पर सहकार्य, संतुलित विकासाला प्रोत्साहन देणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर हे मुद्दे या परिषदेत केंद्रस्थानी असणार आहेत. जी-७ शिखर परिषदेत भारत सातत्याने ग्लोबल साऊथचे प्राधान्यक्रम, समस्या आणि विकाससंबंधी मुद्दे उठवत आला आहे. यावेळी देखील भारत या परिषदेत ग्लोबल साऊथचा बुलंद आवाज म्हणून भूमिका बजावणार आहे.

# धरणांतील पाणी फक्त पिण्यासाठीच

पान १ वरून

बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील धरणांमध्ये सध्या केवळ २५ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही स्थिती अधिक चिंताजनक असल्याने पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. विखे पाटील यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ८५ लाख नागरिकांना ऑगस्ट अखेरपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध राहावे यासाठी आवश्यक साठा राखून ठेवण्याचे निर्देश दिले. खडकवासला धरणातून शेतीसाठी सोडण्यात येणारे आवर्तनही बंद करण्यात आले आहे. सांगली, कोल्हापूर, मराठवाडा आणि नाशिक विभागातील जलसाठ्याचाही तातडीने आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मराठवाडा आणि नाशिक विभागात अपेक्षित पाऊस अद्याप झालेला नाही. त्यामुळे नवीन पाण्याची आवक सुरू होईपर्यंत उपलब्ध साठ्याचा अत्यंत जपून वापर करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करून ग्रामीण आणि शहरी भागातील संभाव्य पाणीटंचाईला सामोरे जाण्याची तयारीही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, पाणीटंचाईच्या काळात धरणे, कालवे, नद्या आणि तलावांमधून होणारा बेकायदेशीर पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाची संयुक्त पथके तयार करण्यात येणार आहेत. अनधिकृत मोटारी, पंप, पाइपलाइन जप्त करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. अशा कारवायांचा साप्ताहिक अहवाल सरकारकडे सादर करावा लागणार आहे. या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असली तरी पिण्याच्या पाण्याचा तुटवडा टाळण्यासाठी हा निर्णय अपरिहार्य असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. आगामी काही आठवड्यांत मान्सूनची स्थिती कशी राहते यावर पुढील धोरण अवलंबून असणार आहे.

### कोठुर्डे धरण आटले मगरी नदीकडे निघाल्या

रायगड जिल्ह्यातील कोठुर्डे धरण पूर्णपणे कोरडे पडल्याने तेथील मगरी आता पाण्याच्या शोधात काळ नदी आणि सावित्री नदीच्या मुख्य प्रवाहांकडे स्थलांतर करत आहेत. त्यांचा हा प्रवास गावातून आहे. यामुळे अनेक गावांच्या परिसरात मगरी दिसू लागल्या आहेत. आतापर्यंत तीन मगरींना रेस्क्यू करण्यात आले असून हे काम महाडमधील सीझकॅम्प या स्वयंसेवी संस्थेने केले. तर या दोन्ही नद्यांमधून पाणी उपसून टँकरने वाहून नेले जात असल्याने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

# उबाठा पक्ष पुन्हा फुटणार?

पान १ वरून

आणि संबंध चांगले आहेत. राजकारणात आम्ही विरोधक असलो तरी वैयक्तिक संबंध जपले आहेत. उद्धव साहेब सुद्धा फडणवीस साहेबांना अनेकदा भेटायला गेले आहेत, संजय देशमुख आयुर्वेद कॉलेजच्या संदर्भात काही माहिती घेण्यासाठी आले होते. मी दिल्लीत असल्यामुळे आणि योगायोगाने तेही आज सकाळी येथे आल्याने भेट झाली. तरीही संशय कायम आहे. भाजपाला काही महत्त्वाची विधेयके मंजूर करून घ्यायची असल्याने त्यांना लोकसभा व राज्यसभेत निर्णायक बहुमत हवे आहे. त्यासाठी पक्ष फोडण्याची मोहीम सुरू झाली आहे.

**TENDER NOTICE**
**NEW SALASAR ORCHID CHSL**
Situated Near Green Court Club, Navghar, Mira Road (E), Thane - 401107
Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.
Tender can be collected from Consultant Office
From: **16/06/2026 up to 22/06/2026**
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission on **23/06/2026**
(up to 5.00 PM)
at NEW SALASAR ORCHID CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted
STAR ASSOCIATES PMC PVT. LTD.
Consulting Engineers
Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East)
Tel. Office. 98208 18155
**Tender Cost Rs. 3,000/- (Non-Refundable)**

# धनगर समाजाचे स्वप्न भंगले

पान १ वरून

तातडीची बैठक बोलावली होती. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना कवळेकर यांनी म्हटले की, आदिवासी विकास मंत्रालयाच्या या निर्णयामुळे धक्का बसला आहे. देशाच्या महानिबंधकांकडे यासंबंधीचा अर्ज बरीच वर्षे प्रलंबित असताना आदिवासी विकास मंत्रालयाने हा निर्णय घेतलाच कसा असा सवाल त्यांनी उपस्थित केला. केंद्र सरकारने या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी केली.

धनगर समाजातील नेत्यांचे एक प्रतिनिधी मंडळ लवकरच मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांची भेट घेऊन हा निर्णय रद्द करण्याची विनंती केंद्र सरकारला करावी, अशी मागणी करणार आहेत, असे कवळेकर यांनी सांगितले. दरम्यान, महाराष्ट्रातील धनगर समाजाची एसटी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी जुनी आहे. या समाजाला सध्या भटक्या जमाती-क (एनटी-सी) या प्रवर्गातून ३.५ टक्के आरक्षण मिळत आहे. त्यांची मुख्य मागणी घटनेनुसार एसटी प्रवर्गातील सर्व लाभ मिळावेत ही आहे. धनगड या जमातीला एसटी आरक्षण आहे. धनगड म्हणजेच महाराष्ट्रात धनगर असा युक्तिवाद करीत ही मागणी केली जात आहे.

पान १ वरून

भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात कान्हे येथील आदर्श जिल्हा परिषद शाळेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यांनी चिमुकल्यांशी संवाद साधत शालेय साहित्याचे वाटप केले. जिल्हा परिषद शाळा आता आधुनिक सुविधांनी सुसज्ज होत असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. ठाण्यातील किसननगर येथील महापालिका शाळा क्रमांक २३ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याच शाळेत शिक्षण घेतल्याच्या आठवणींना

# सुट्टी संपली! चिमुकल्यांचे स्वागत

उजाळा देताना त्यांनी महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांमधूनही देशाचे नेते, शास्त्रज्ञ आणि यशस्वी व्यक्ती घडल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी दडपण न घेता आनंदाने शिक्षण घेण्याचा संदेश दिला. छत्रपती संभाजीनगरमध्ये पालकमंत्री संजय शिरसाट यांनीही सहभाग घेत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. हिंगोली, बीड आणि इतर जिल्ह्यांमध्येही प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

नवागत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, पाठ्यपुस्तके, गणवेश देण्यात आले. काही ठिकाणी विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले, तर बीडमध्ये विद्यार्थ्यांना गुलाबजामून भरवून स्वागत करण्यात आले. शाळांमध्ये सेल्फी पॉइंट, फुगे आणि आकर्षक सजावट करण्यात आल्याने पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. राज्याचे सांस्कृतिक तथा इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास विभागमंत्री आशिष शेलार यांनी घाटकोपर पूर्व, पंतनगर परिसरातील मनपा शाळा क्र. ३ येथील विद्यार्थ्यांचे नवीन दप्तर, पुस्तके व लेखन साहित्य देऊन उत्साहात स्वागत केले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice (3rd Call)**

Maharashtra State Electricity Transmission Company Ltd, EHV PC O&M Zone Vashi invites bids through SRM e-Tender in two bid system (Techno-commercial Bid & Price Bid) from the eligible registered bidders for following works;

| RFx No. | E-Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000040033 | T-05/ 2026-27 (3rd Call) | Replacement of existing Battery Sets & Battery Chargers by New Battery Sets & Battery Chargers in various Substations under EHV O&M Division Bhandup including buyback of replaced Battery Sets and Chargers. | Rs. 143.60 Lakhs (incl. GST) | Rs. 1,43,602.41 | Rs. 5900/- |

**Sale period :** 15.06.2026 to 25.06.2026, **Last Date of Submission:** 25.06.2026 up to 15:00 Hrs,
**Date of opening (Tech. bid):** 25.06.2026 at 15:30 Hrs (if possible).
**Contact person:** Executive Engineer, EHV PC O&M Zone, Vashi.
Phone No. (022) 27666010 (P) / 27665994.
For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Chief Engineer,**
**EHV PC (O&M), Zone, MSETCL, Vashi**

नवाकाळ

• मुंबई | मंगळवार १६ जून, २०२६ • पान -८

# 'कुमकुम भाग्य' फेम संचिता उगलेची वसईत राहत्या घरी आत्महत्या



**मुंबई** - 'कुमकुम भाग्य' या लोकप्रिय मालिकेमुळे घराघरात पोहोचलेली अभिनेत्री संचिता उगले (२२) हिने नालासोपारा येथील राहत्या घरी काल ७ वाजताच्या सुमारास आत्महत्या केली. या घटनेमुळे कुटुंब आणि मनोरंजन क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात असून तिच्या निधनाने चाहत्यांनाही मोठा धक्का बसला आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

संचिता उगले ही नालासोपारा पूर्वेतील आचोळे परिसरातील साई संतोषी अपार्टमेंटमध्ये आई-वडिलांसोबत राहत होती. संध्याकाळी सातच्या सुमारास तिने बेडरूमचा दरवाजा आतून बंद केला होता. बराच वेळ झाला तरी ती बाहेर न आल्याने कुटुंबियांना संशय आला. त्यांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता संचिता छताच्या पंरव्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली.

# शाकाहारी विरुद्ध मांसाहारी

**पूर्ण शाकाहारी लोक आपल्या शेजारी म्हणून शाकाहारी लोकांनाच जास्त प्राधान्य का देतात? किंवा आपला शेजारी शक्यतो शाकाहारीच असावा असे त्यांना का वाटते? हा आपल्या समाजात नेहमीच चर्चिला जाणारा आणि काहीसा संवेदनशील विषय आहे. हा लेख कृपया पूर्ण वाचा. अर्धवट वाचून कोणत्याही निष्कर्षाला येऊ नका, ही विनंती.**



**मांसाहार** करणारे लोक शाकाहारही तितक्याच सहजतेने करतात, त्यामुळे त्यांना शाकाहारी अन्नाचा किंवा त्याच्या वासाचा त्रास होणे शक्यच नसते. परंतु, शाकाहारी व्यक्तीची मनस्थिती किंवा त्यांच्या मनाची अवस्था याच्या अगदी उलट असते. मुळात, शाकाहार करणाऱ्या लोकांच्या मनात एखादा प्राणी मारून खाण्याच्या कल्पनेनेच एक प्रकारची नैसर्गिक किळस असते. त्यातच शिजवल्या जाणाऱ्या मांसाचा किंवा माशांचा उग्र वास त्यांच्यासाठी अत्यंत असह्य ठरतो. अर्थात, शाकाहारी लोकांमध्येही संवेदनशीलतेच्या वेगवेगळ्या श्रेणी असतात; काही जण खूप जास्त संवेदनशील असतात तर काही थोडे कमी.

**घरातील एक वैयक्तिक अनुभव आणि संवेदनशीलता**

माझं स्वतःचं उदाहरण द्यायचं झालं, तर मी अंडं खातो आणि मला ते प्रचंड आवडतं देखील. पण माझ्या घरामध्ये 'अंडं' या शब्दाचा उच्चार करायलाही सक्त मनाई आहे. तिथे अंड्याचा एखादा पदार्थ बनवणं तर खूप दूरची गोष्ट!

लहान असताना एकदा माझ्या बाबांनी माझ्यासाठी घरी ऑम्लेट बनवलं होतं. त्या एकाच अनुभवानंतर, त्या ऑम्लेटच्या वासाने माझ्या आईला थेट उलट्या झाल्या आणि पुढे सलग चार ते पाच तास तिला कमालीचा त्रास होत राहिला. त्यानंतर आईने आम्हा दोघांनाही निक्षून सांगितले-घरामध्ये अंडे या पदार्थाचे नावही घ्यायचे नाही! तुम्हाला खायचं असेल तर बाहेर जाऊन खा, घरामध्ये काहीही चालणार नाही.

आक्रशून सांगायचं तर, ही परिस्थिती अशा कुटुंबात आहे जिथे एकमेकांवर जीवापाड प्रेम आहे. जर रक्ताच्या आणि प्रेमाच्या माणसांच्या बाबतीत ही शारीरिक संवेदनशीलता असेल, तर शेजाऱ्यांच्या बाबतीत काय होत असेल, याची कल्पना आपण करू शकतो.

आफ्रिकन देशांमधील अनुभवः 'बुशमीट' आणि उग्र गंध





माझ्या कामाच्या निमित्ताने मला नायजेरिया, काँगो यांसारख्या आफ्रिकन देशांमध्ये तसेच सिंगापूर, मलेशिया आणि जपानमध्ये जाण्याची संधी मिळाली. मी स्वतः अंडं खातो आणि गेल्या चार ते पाच वर्षांत मी कोळंबी देखील खाऊन पाहिली आहे, जी मला आवडली. पण ती खाण्याचा माझा कोणताही अट्टाहास नसतो.

या प्रवासात माझ्यासोबत अनेक भारतीय सहकारी होते, जे कट्टर मांसाहारी होते. पण हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोक सोडले, तर आफ्रिका किंवा जपानमधील काही मांसाहारी पदार्थ खाण्याची हिंमत आपल्याकडील चांगल्या चांगल्या मांसाहारी लोकांनाही होणार नाही.

नायजेरियातील अनुभव : मी जेव्हा नायजेरियामध्ये होतो, तेव्हा तिथल्या कंपनीच्या कॅन्टीनमध्ये किंवा अगदी फाईव्ह स्टार चिनी हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये जाणेही नकोसे व्हायचे. माझ्यासोबत माझे मॅनेजर योगेश पाटील होते, जे स्वतः कट्टर मांसाहारी होते. पण तिथल्या हॉटेलच्या रेस्टॉरंटमधील त्या विशिष्ट वासामुळे तिथे बसून जेवणं आम्हाला कधीच शक्य झालं नाही. शेवटी आम्ही हॉटेल प्रशासनाला स्विमिंग पूलच्या बाजूला एक टेबल मांडायला सांगायचो आणि तिथे आमचे जेवण घेऊन जेवायचो.

जंगलातील प्लांट आणि 'बुशमीट' (Bushmeat): पुढे जेव्हा आम्ही जंगलात असलेल्या एका ऑईल अँड गॅस प्लांटवर गेलो, तिथल्या कॅन्टीनची अवस्था तर आणखीनच कठीण होती. तिथले लोक पूर्णपणे 'रेड मीट' खातात. आपल्याकडील गाय, म्हैस, बकरा, चिकन किंवा मासे हे त्यांच्यासाठी फार किरकोळ आहे. तिथे माकडे, मगरी आणि वटवाघूळ यांसारखे वन्य प्राणी (ज्याला स्थानिक भाषेत 'बुशमीट' म्हणतात) सर्रास खाल्ले जातात. जे समोर येईल ते खाणे हीच त्यांची पद्धत आहे.

सांगायचा मुद्दा हा की, आपल्याकडे अत्यंत अभिमानाने मटणावर ताव मारणारे लोकही तिथलं मांसाहार, त्याचं रूप आणि वास बघून लांब पळतात; कारण तो वास पाहून खाण्याची इच्छाच मरून जाते. तिथे आलेले एक-दोन पूर्ण शाकाहारी भारतीय तर इतके हैराण झाले की, कधी एकदा भारतात परत जातोय, अशी त्यांची अवस्था झाली होती. मांसाहाराच्या या अतिवापरामुळे तिथल्या लोकांच्या शरीराचा नैसर्गिक गंधही खूप उग्र असतो, ज्याचा अनुभव तिथल्या वातावरणात राहिलेल्या प्रत्येकाने घेतला असेल.

**जपान आणि पूर्व आशिया : कच्चा आणि आंबवलेला मांसाहार**

सिंगापूर किंवा जपानमधील मांसाहार देखील भारतातील मांसाहारी लोकांना झेपणारा नाही. आपल्याकडे वेगवेगळ्या मसाल्यांचा वापर करून मांसाचा उग्र वास दाबला जातो. पण जपानमध्ये कच्चं अन्न खाण्याची मोठी प्रथा आहे. तिथे तुमच्या डोळ्यांसमोर चालणारे जिवंत मासे किंवा जिवंत ऑक्टोपस (ज्याला 'इकीजुकी' - Ikizukuri शैली म्हणतात) लोक आवडीने खातात.

त्याहून कठीण प्रकार म्हणजे जपानमध्ये काही मासे मुद्दाम कुजवले किंवा आंबवले जातात.

'कुसाया' (Kusaya) आणि 'फुनाझुशी' (Funazushi): हा जपानमधील खास आंबवलेल्या माशांचा प्रकार आहे. याचा वास आपल्याकडील सार्वजनिक शौचालयापेक्षाही कितीतरी पटीने उग्र आणि विचित्र असतो, जो शब्दांत सांगणे खरोखर अचंबित करणारे आणि अशक्य आहे.

मी स्वतःला खूप सहनशील समजायचो. माझ्यासोबत एकाच टेबलवर बसून कोणी नॉनव्हेज खाल्ले तरी मला कधी किळस आली नव्हती की त्याचा माझ्यावर काही परिणाम झाला नव्हता. पण जपानमध्ये या आंबवलेल्या पदार्थांचा वास नाकात गेल्याबरोबर अक्षरशः माझं डोकं भणभणायला लागलं आणि आता माझी उलटी होते की काय, अशी भीती वाटू लागली. तिथल्या मॉलमधील फूड कोर्टमध्ये तर हे पदार्थ सर्रास असायचे. त्यामुळे त्या परिसरातून जाताना आम्ही आधीच मोठा श्वास रोखून धरायचो आणि वेगाने पलिकडच्या बाजूला निघून जायचो.

केवळ व्हेज-नॉनव्हेज नव्हे, खेळ आहे शरीराच्या आणि मनाच्या 'कंडिशनिंग'चा!

येथे केवळ शाकाहार किंवा मांसाहार हाच भाग नाही. मुळात आपण जे खातो त्याचा गंध, त्याचे रूप आपल्या शरीराने आणि मनाने किती स्वीकारलेले आहे, याला सर्वात जास्त महत्त्व आहे. हे समजून घेण्यासाठी मी तुम्हाला एका पूर्णपणे शाकाहारी पदार्थाचे आणि एका फळाचे उदाहरण देतो-ते म्हणजे 'ड्युरियन' (Durian).

मलेशिया आणि सिंगापूरमध्ये या फळाबाबत अतिशय कडक नियम आहेत. या फळाचा गंध इतका तीव्र आणि उग्र असतो की, कोणीही हे फळ सार्वजनिक जागेत बसून खाऊ शकत नाही. जर का कोणी हे फळ सार्वजनिक ठिकाणी, ट्रेनमध्ये, मेट्रोमध्ये किंवा बसमध्ये खाताना किंवा घेऊन जाताना आढळले, तर तो तिथे मोठा दंडनीय अपराध मानला जातो.

स्वरूप आणि उग्रताः हे फळ हुबेहूब आपल्या फणसासारखे दिसते, परंतु याला फणसापेक्षाही जास्त अणकुचीदार आणि टोचणारे काटे असतात. आरोग्याच्या दृष्टीने हे अत्यंत उत्तम आणि शरीराला सर्वाधिक फायदा करून देणारे फळ आहे; पण तरीही याच्या उग्र वासामुळे तुम्ही ते पब्लिकमध्ये खाऊ शकत नाही.

घरगुती अनुभव आणि एक मजेशीर (पण विचित्र) वास्तवः हे फळ जर घरात आणून कापले, तर त्याचा वास पुढचा संपूर्ण दिवस घरातून जात नाही. तो वास इतका तीव्र आणि कोंदट असतो की माणसाचा जीव अक्षरशः केविलवाणा होतो. आणि यातली सर्वात मजेशीर आणि तेवढीच विचित्र गोष्ट म्हणजे-ड्युरियन हे फळ खाऊन झाल्यानंतर जर एखादी व्यक्ती शौचास गेली, तर त्यानंतर दुसरा माणूस त्या शौचालयात जाण्यापूर्वी चारवेळा विचार करेल अशी अवस्था होते! (मला माहीत आहे, हे ऐकायला एकाच वेळी जितके विनोदी वाटते, तितकेच ते गंभीरही आहे!)

या फळाच्या उदाहरणावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, मूळ समस्या शाकाहार की मांसाहार ही नाहीच. आपण लहानपणापासून कोणत्या वातावरणात आणि कशा प्रकारच्या 'कंडिशनिंग'मध्ये (मानसिक व शारीरिक जडणघडणीत) वाढलो आहोत, हा सगळा खेळ त्याचा आहे. आपले शरीर आणि मन कोणत्या गोष्टीला स्वीकारू शकते आणि कशामुळे त्याच्यात 'किळस' ही भावना तयार होते, हे सर्वस्वी आपल्या सवयींवर अवलंबून असते.

एकमेकांबद्दल सामंजस्य आणि खऱ्या अडचणीवर पर्याय

हे सर्व लिहिण्याचा उद्देश हाच आहे की, आपल्याकडील मांसाहार करणाऱ्या लोकांचा अनेकदा असा आक्षेप असतो की, शाकाहारी लोक आपल्या आजूबाजूला मांसाहारी शेजारी स्वीकारायला नकार का देतात?

पण शेजारी जेव्हा मांस-मच्छी बनत असते आणि त्याचा वास खिडक्यांमधून किंवा गॅलरीतून थेट घरात येतो, तेव्हा शाकाहारी माणसाला नेमका काय शारीरिक आणि मानसिक त्रास होतो, याची कल्पना आपल्याकडील नॉनव्हेज खाणारे लोक सहज करू शकत नाहीत. त्यासाठी त्यांनी कधीतरी आशियाई किंवा आफ्रिकन देशांमधील ही ड्युरियन फळासारखी किंवा आंबवलेल्या माशांसारखी टोकाची परिस्थिती अनुभवली पाहिजे, मग त्यांच्या लक्षात येईल की शाकाहारी लोक असे का वागतात.

अर्थात, काही शाकाहारी लोक खूप जास्त टोकाचे बोलतात किंवा उघडपणे घृणा दाखवतात, ज्यामुळे समोरच्याच्या मनाला दुखापत होते. असे करणे नक्कीच चुकीचे आहे, कारण प्रत्येकाने प्रत्येकाची खाण्यापिण्याची पद्धत आणि वैयक्तिक स्वातंत्र्य स्वीकारले पाहिजे. यामध्ये कोणी बरोबर किंवा कोणी चुकीचे असा भाग नाही; कारण मांसाहार करणारे लोक शेजाऱ्यांना त्रास व्हावा म्हणून मुद्दाम वास पसरवत नसतात. परंतु, त्या गोष्टीचा प्रत्यक्ष शारीरिक त्रास शाकाहारी लोकांना होतो, हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रतिक्रिया कधीकधी तीव्र असतात.यावर नक्की काय सुवर्णमध्य असावा, हे सांगणे कठीण आहे.

परंतु आपण एकमेकांची मानसिकता लक्षात घेतली पाहिजे व शाकाहारी लोकांनी देखील सामंजस्य बाळगले पाहिजे. नॉनव्हेज खाल्ले नाही तरी देखील त्याच्या वासाचा व गंधाचा त्रास होणार नाही यासाठी स्वतःला तयार करणे देखील गरजेचे आहे.

- मयूर जोशी

# मंत्रालयावर २६ जूनला बौद्ध महासभेचा मोर्चा

■ मुंबई

**अनुसूचित** जातीतील उपवर्गीकरणाच्या विरोधात बौद्ध महासभेच्या वतीने शुक्रवार २६ जून रोजी मुंबईतील मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्च्याद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त हा मोर्चा आयोजित करण्यात आला असून, उपवर्गीकरणाच्या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविण्यात येणार आहे. या मुद्यावर समाजामध्ये नाराजी वाढत असल्याचा दावा आयोजकांकडून करण्यात आला आहे. मोर्च्यानंतर प्रतिनिधी मंडळाकडून मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले जाणार असून, उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घेण्याची मागणी केली जाणार आहे. या मोर्चात राज्यभरातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'बेस्ट'च्या कंत्राटी चालकांचा ओव्हरटाईम यापुढे बंद करणार

■ मुंबई

**बेस्ट** परिवहन सेवेमधील वाढत्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर बेस्ट प्रशासनाने बेस्टच्या कंत्राटी चालकांचा अमर्याद 'ओव्हर टाईम' बंद करण्याचे ठरवले आहे. नवीन शिफ्ट हवी असल्यास कंत्राटी चालकांना बेस्टच्या निवारा केंद्रात सक्तीची विश्रांती घेणे यापढे बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती बेस्ट समिती अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनी सांगितले.

तृष्णा विश्वासराव यांनी सांगितले की, दादरच्या बेस्ट अपघातानंतर कंत्राटी बस चालकांना अमर्याद 'ओव्हर टाईम' दिला जात असल्याची बाब पुढे आली आहे. अशात काही कंत्राटी चालक पगार कमी असल्यामुळे दोन शिफ्ट करतात. मात्र,या दरम्यान किमान ९ तासांची सक्तीची विश्रांती न घेता कंत्राटी चालक खाजगी



वाहतूक सेवा किंवा स्वतःच्या वाहनावर काम करत असतात आणि पुन्हा बेस्टच्या शिफ्टवर काम करण्यास येतात. त्यामुळे शरीराला विश्रांती न मिळाल्याचे परिणाम चालकांच्या कामावर दिसून येत आहेत.

# अयोध्या राम मंदिर देणगी अपहार प्रकरणी सूमोटो दखल घ्या! सरन्यायाधीशांना पत्र



■ नवी दिल्ली

**अयोध्येतील** श्रीराम मंदिरातील देणगी निधीमध्ये कथित अपहार झाल्याप्रकरणाची सूमोटो दखल घ्यावी, अशी विनंती करणारे पत्र वकील अनुप अवस्थी यांनी सरन्यायाधीश सूर्य कांत यांना पाठविले. उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी ३ सदस्यीय विशेष तपास पथक स्थापन केल्यानंतर अवस्थी यांनी हे पत्र पाठवले. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतः हून दखल घेऊन (सूमोटो) न्यायालयाच्या देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी करून एफआयआर दाखल करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी पत्राद्वारे केली. तसे केल्यास जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राहील, असे त्यांनी पत्रात नमूद केले.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी राम मंदिराला मिळालेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीपैकी मोठी रक्कम गायब झाल्याचा आरोप केला आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील पोस्टमध्ये मंदिर ट्रस्टभोवती निर्माण झालेल्या परिस्थितीला लाजिरवाणी असे संबोधत न्यायव्यवस्थेने स्वतःहून हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली. या वादाला आणखी हवा मिळाली ती भाजपाचे माजी खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या वक्तव्यामुळे. त्यांनी देणगीच्या कथित गैरवापराबाबत माहिती असल्याचे सांगितले, मात्र अधिक तपशील उघड करण्यास नकार दिला. आरोपांचा केंद्रबिंदू मंदिर ट्रस्टशी संबंधित देणगी व्यवस्थापन आणि आर्थिक व्यवहार आहेत. तपास यंत्रणा सीसीटीव्ही फुटेजची पाहणी, संबंधित व्यक्तींची चौकशी व पुराव्यांची तपासणी करत आहे. या प्रकरणात पारदर्शक चौकशीची मागणीही जोर धरत आहे. राम मंदिराच्या देणगी निधीतील सुमारे ७ कोटी रुपयांच्या कथित अपहाराचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या विनंतीनंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय एसआयटी स्थापन केली आहे.

# राज्यातील आरटीओ कर्मचारी आजपासून बेमुदत संपावर

**मुंबई-** आरटीओ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे आरटीओ कर्मचाऱ्यांनी अखेर उद्या मंगळवार १६ जूनपासून राज्यव्यापी बेमुदत संपाची हाक दिली आहे. या संपामुळे राज्यातील परिवहन कार्यालयांमधील सेवा पूर्णपणे ठप्प होणार असून त्याचा मनस्ताप नागरिकांसह वाहन मालक-चालकांना होणार आहे. आरटीओ कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षे झाली तरी अद्याप सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाहीत. नियम तयार नसल्याने कर्मचाऱ्यांना हक्काच्या पदोन्नतीपासून वंचित राहावे लागत आहे. प्रशासकीय स्तरावर सुटू शकणाऱ्या या मागण्यांवर केवळ मार्गदर्शनाचे कारण पुढे करत प्रस्ताव शासनाकडे पाठवून वेळखाऊ धोरण राबवले जात असल्याचा आरोप मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी केला आहे.

# तृणमूलच्या २० बंडखोर खासदारांमुळे पुन्हा 'आप'सारखाच घटनात्मक पेच

■ नवी दिल्ली

**ममता बॅनर्जी** यांच्या तृणमूल काँग्रेस पार्टीतून फुटून वेगळे झालेल्या २० खासदारांनी काल पक्षांतर बंदी कायद्यापासून वाचण्यासाठी जी खेळी केली त्यामुळे आम आदमी पार्टीच्या ७ राज्यसभा खासदारांच्या बंडखोरीवेळी तिढा निर्माण झाला होता तसाच तिढा पुन्हा निर्माण झाला आहे. या २० खासदारांनी आपण नॅशनॅलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) या पक्षामध्ये विलीन होत असल्याचे पत्र रविवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिले आहे.

या एनसीपीआय पक्षाचा संपूर्ण भारतात कुठल्याही स्तरावर निवडून आलेला एकही लोकप्रतिनिधी नाही. त्यामुळे अशा पक्षामध्ये विलीन होणाऱ्या खासदारांवर पक्षांतर बंदी कायदा लागू होतो की नाही, असा घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. पक्षांतर बंदी कायदा भारतीय राज्य घटनेच्या दहाव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आला आहे.

# पुन्हा भिंगरी फिरली! सहदेव बेटकरांचा उबाठाला रामराम! भाजपात प्रवेश निश्चित

■ रत्नागिरी

**कोकणातील** राजकारणात पुन्हा पक्षांतराची भिंगरी फिरली. सातत्याने पक्ष बदल करणारे म्हणून प्रसिद्ध असलेले उबाठाचे रत्नागिरी जिल्हा संपर्क प्रमुख सहदेव बेटकर यांनी आता हा पक्षही सोडला असून पदाचा राजीनामा दिला आहे. येत्या काळात भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत ते भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. कुणबी आणि ओबीसी समाजाचे नेते बेटकर यांच्या या निर्णयामुळे कोकणातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून बेटकर यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चेला उधाण आले होते. अखेर त्यांनी उबाठाच्या जिल्हा संपर्क प्रमुख पदाचा राजीनामा दिल्याने या चर्चांना बळ मिळाले. एप्रिल २०२५ मध्ये त्यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत उबाठामध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांच्यावर रत्नागिरी जिल्हा संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी सोपवली होती. सहदेव बेटकर यांचा राजकीय प्रवास विविध पक्षांमधून झाला आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात उद्या पुढील सुनावणी होणार

■ बीड

**सरपंच** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील पुढील सुनावणी बुधवार १७ जून रोजी होणार आहे. विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांच्या उपस्थितीत आजची सुनावणी न्या.जयश्री पुलाटे यांच्या न्यायालयात पार पडली. आजच्या सुनावणी दरम्यान आरोपी विष्णू चाटेच्या जामीन अर्जावर दोन्ही बाजूंनी युक्तिवाद झाला.

विष्णू चाटेच्या वकिलांनी अटकेच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत ही अटक बेकायदेशीर असल्याचा दावा केला. अटक केल्यानंतर २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करणे आवश्यक असताना तसे करण्यात आले नाही. संबंधित गुन्ह्यात तब्बल २२ दिवस उशिराने ताब्यात घेण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करत जामीन मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. मात्र, विशेष सरकारी वकील ॲड. निकम यांनी या युक्तिवादाला तीव्र विरोध दर्शवला. मकोका लागू असल्याने सर्व गुन्ह्यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या दीड वर्षात कोणतीही तक्रार न करता आता अचानक मुद्दे उपस्थित करून खटल्याची सुनावणी लांबवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

